मे. रुद्राप्पाआण्णा शंकरशेठ
खेराडकर सराफ
हॉलमार्क मानांकित सुवर्णपेढी
सोने । चांदी । हिरे । रत्ने
तासगाव : सराफकट्टा, सोमवार पेठ, तासगांव. 02346-240607, 02346-240434
पलूस : दुकानगाळा नं. १५/१६, मार्केटयार्ड, नवीन बस स्टँडसमोर, पलूस. 02346-229454
सांगली : अभिमान अॅसेट, श्री गणपती मंदिर रोड, हॉटेल चिनारजवळ, विश्रामबाग, सांगली. 0233-2303177


# दक्षिण महाराष्ट्र केसरी

● Dakshin Maharashtra Kesari

● वर्ष ३९ ● अंक २९४ ● RNI NO. 49899/90 ● रविवार, २७ एप्रिल २०२५ ● पाने : १०+४, सहा रुपये (सांगली) ● Year 39 ● Issue 294 ● Pages 10+4 ● Six Rupees ● 27 April 2025 ● Sangli


## केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचा आज जिल्हा दौरा

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह हे आज रविवार, दि. २७ रोजी सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांच्या दौऱ्याचा सविस्तर कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. रविवार, दि. २७ एप्रिल रोजी मे. बी. जी. चितळे, भिलवडी स्टेशन येथे आगमन व तेथील कार्यक्रमास उपस्थिती व मुक्काम. दि. २८ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता मे. बी. जी. चितळे, भिलवडी स्टेशन येथून इचलकरंजी, जि. कोल्हापूरकडे प्रयाण.

## दिल्लीचा पारा ४२ अंशावर

**नवी दिल्ली :** दिल्लीचा पारा ४२ अंशावर शनिवारी पोहोचला. त्यामुळे गेल्या तीन वर्षांतील उच्चांकी तपमानाची नोंद झाली असल्याची माहिती हवामान विभागाने दिली. हवामान खात्याच्या आकडेवारीनुसार काल दिल्लीचे तपमान ४२.१ अंशावर पोहोचले होते. यापूर्वी २०२२ मध्ये कमाल तपमान ४३.२ अंश होते. दरम्यान, काल २०.७ अंश किमान तपमान नोंदविले गेले. सरासरी हंगामी तपमानाचा विचार करता ते ३.१ अंशाने कमीच होते. आद्रता १५ ते ३५ टक्क्यापर्यंत होती. आज (रविवारी) ढगाळ वातावरण राहणार आहे.

## लाहोर विमानतळावर भीषण आग

**लाहोर :** पाकिस्तानमधील लाहोर शहरातील अल्लामा इक्बाल विमानतळाला शनिवारी सकाळी भीषण आग लागली. त्यामुळे सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.विमातळावर शेकडो प्रवासी अडकून पडले असून बचाव पथक आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत. विमानतळाला आग लागल्याच्या वृत्ताने देशभरात गोंधळ उडाला. भीषण आगीमुळे विमानतळाची संपूर्ण

(पुढील मजकूर पान ८ वर)

# सुरक्षा यंत्रणांकडून १७५ संशयित ताब्यात



पहलगाममधील क्रौर्य

**श्रीनगर : पहलगाममधील नरसंहारानंतर सुरक्षा दलाने दक्षिण काश्मीरमध्ये जोरदार कारवाई सुरू केली आहे. सुरक्षा दलांकडून अनंतनाग, पुलवामा, कुलगाम, शोपियामध्ये शोध मोहीम सुरु आहे. गेल्या ४८ तासांत १७५ हून अधिक संशयितांना सुरक्षा दलाने ताब्यात घेतले आहे. तर, पोलिसांकडून सर्वसामान्य नागरिकांना काही संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने कळवा, असे आवाहन केले जात आहे.**

दरम्यान, काश्मीरमध्ये १४ स्थानिक दहशतवादी सक्रिय असल्याची माहिती मिळत आहे. गुप्तचर संस्था जम्मू-कश्मीरमधील स्थानिकदहशतवाद्यांचीयादी तयार करत आहे. हे स्थानिक दहशतवादी पाकिस्तानी दहशतवाद्यांना मदत करतात. त्यांना आश्रय आणि संसाधने पुरवतात, असा संशय आहे.

दक्षिण काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना प्राण गमवावे लागले. यात बहुतांश पर्यटक आहेत. या हल्ल्याचा तपास एनआयएमार्फत केला जात आहे.

## एनआयएकडून जबाब नोंदविण्याचे काम सुरु

***कोलकाता :*** *पहलगाममधील नरसंहाराचा राष्ट्रीय तपास संस्थेमार्फत (एनआयए) तपास केला जात आहे. या हल्ल्या प्राण गमवालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील सदस्यांचे जबाब नोंदवून घेण्याचे काम एनआएचे अधिकारी करत आहेत. एनआयएचे एक पथक शुक्रवारी कोलकातामध्ये दाखल झाले.*

*या पथकाने काल समीर गुहा यांच्या कुटुंबातील सदस्यांचे जबाब नोंदवण्यासाठी त्यांच्या निवासस्थाला भेट दिली. एनआयएचे पथक दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या बितन अधिकारी यांच्या पत्नीचीही वैष्णवघाटा परिसरात भेट घेऊन त्यांचा जबाब नोंदवेल, असे त्यांनी सांगितले.*

*जम्मू आणि काश्मीर पोलिस, लष्कर आणि निमलष्करी दल हल्लेखोर दहशतवाद्यांचा शोध घेत आहेत. पर्यटकांवर बेछूट गोळीबार केल्यानंतर दहशतवादी जंगलात पळून गेले. या दहशतवाद्यांच्या शोधासाठी युद्धपताळीवर मोहीम राबविली जात आहे. दाट जंगलात दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी मानवरहित हवाई वाहने (यूएव्ही) आणि ड्रोनसारख्या अद्ययावत उपकरणांची मदत घेतली जात आहे. या हल्ल्यात पाच ते सात दहशतवादी सहभागी होते, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. यामध्ये पाकिस्तानात प्रशिक्षण घेतलेल्या दोन दहशतवाद्यांचा समावेश असल्याचेही समोर आले आहे.*

# सांगली सिव्हिलला ४ कोटी ६२ लाखांचा दंड

## हरित न्यायालयाचा दणका; मिरज सिव्हिलला एसटीपी प्लांट उभारण्याचे आदेश

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** प्रदूषण निर्माण केल्याप्रकरणी पुण्याच्या हरित न्यायालयाने सांगली सिव्हिल हॉस्पिटलला तब्बल ४ कोटी ६२ लाख ६० हजारांचा दंड ठोठावला आहे, तर मिरज सिव्हिलला २४ महिन्यात एसटीपी प्लांट उभारा अन्यथा दंड भरा असा आदेश दिला आहे.

ही माहिती सामाजिक कार्यकर्ते रवींद्र वळवडे,अॅड. ओंकार वांगीकर यांनी पत्रकार बैठकीत दिली. यावेळी उध्दव सेनेचे मयुर घोडके,स्वतंत्र भारत सेनेचे सुनिल फराटे आदी उपस्थित होते.

२६ एप्रिल २०२४ रोजी सांगली सिव्हिल हॉस्पिटल व मिरज सिव्हिल हॉस्पिटल यांचे मार्फत होणाऱ्या गंभीर प्रदूषणाबाबत याचिकाकर्ते रवींद्र कुबेर वळवडे यांनी हरित न्यायालय पुणे येथे याचिका दाखल केलेली होती. सदर याचिकेबाबत अंतिम सुनावणी दि. १७ एप्रिल २५ रोजी पूर्ण होऊन हरित न्यायालय पुणे यांनी अंतिम आदेश पारित केलेले आहेत. सांगली सिव्हिल हॉस्पिटल व मिरज सिव्हिल हॉस्पिटल यांच्या मार्फत होणाऱ्या गंभीर प्रदूषणाबाबतच्या लढ्यास यश आलेले आहे. दोन्ही सरकारी हॉस्पिटल हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वैध परवान्याशिवाय चालू आहेत, तसेच जैव वैद्यकीय कचरा यांच्या नियमानुसार वर्गीकरण व विघटन केले जात नसलेने, तसेच दोन्ही हॉस्पिटलचे घातक असे सांडपाणी विनाप्रक्रिया करता बाहेर सोडले जात आहे. सद्यस्थिती देखील अद्याप हीच आहे. त्यास अनुसरुन १७ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या अंतिम सुनावणी दरम्यान मिरज सिव्हिल हॉस्पिटल यांनी २४ महिन्यांच्या कालावधीमध्ये एसटीपीची यंत्रणा उभी करून कार्यान्वित करणेबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करून निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन काम चालू झाल्याचे कळविले. त्यास अनुसरून हरित न्यायालय यांनी दिलेल्या अंतिम आदेशानुसार जर एसटीपी स्थापन २४ महिन्यांमध्ये पूर्तता झाली नाही, तर मागील तारखेपासूनच मिरज सिव्हिल हॉस्पिटल यांना दंडाची संपूर्ण रक्कम आकारण्यात येईल असे आदेश दिलेले आहेत.

परंतु सांगली सिव्हिल हॉस्पिटल यांनी एसटीपीची यंत्रणा उभी करण्याबाबत कोणतीही प्रक्रिया चालू न केल्याने हरित न्यायालय यांनी दिलेल्या अंतिम आदेशानुसार सिव्हिल हॉस्पिटल सांगली यांनी ईटीपी, एसटीपी इत्यादी स्थापन करण्यासाठी कोणतेही गंभीर प्रयत्न केलेले दिसत नाहीत आणि ते कधीपर्यंत स्थापित केले जातील याची कोणतीही कालमर्यादा दिलेली नाही. म्हणून, पर्यावरण प्रदूषण केलेबाबत ४ कोटी,

(पुढील मजकूर पान ८ वर)

## लाचखोर कर्मचाऱ्याला मदत करणारा तहसीलदार निलंबित

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** लाचलुचपतच्या जाळ्यात अडकलेल्या कृषी विभागातील गुण नियंत्रण निरीक्षक संतोष चौधरी याला अटकेनंतर मदत केल्याप्रकरणी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयातील संजय गांधी विभागाचे तहसीलदार मनोज ऐतवडे यांना काल निलंबित करण्यात आले. ही कारवाई पुणे विभागाचे आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली.

गुण नियंत्रण अधिकारी चौधरी याला चार दिवसापूर्वी लाचेची मागणी केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती. अटकेनंतर न्यायालयात आणि त्यानंतर रुग्णालयात मदत केल्याचा ठपका ऐतवडे यांच्यावर ठेवण्यात आला होता. शिस्तभंगाची कारवाई म्हणून त्यांना काल निलंबित करण्यात आले.

## चौकशीसाठी पाकिस्तान तयार

**इस्लामाबाद :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यासंदर्भात आम्ही कोणत्याही निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशीस तयार असल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे.

पहलगाममधील अलीकडील दुर्घटना सततच्या आरोप-प्रत्यारोपाच्या खेळाचे आणखी एक उदाहरण असून, जी आता थांबली पाहिजे. एक जबाबदार देश म्हणून आम्ही आमची स्पष्ट भूमिका मांडत आहेत.

(पुढील मजकूर पान ८ वर)

# पहलगाम हल्ल्यातील दोन दहशतवादी देहूरोडमधील पर्यटकाच्या मोबाईलमध्ये कैद

**पिंपरी :** काश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेल्या देहूरोड येथील एका नागरिकाच्या मोबाईलमध्ये पहलगाम हल्ल्यातील दोन दहशतवादी कैद झाले आहेत. या दोन दहशतवाद्यांची छायाचित्र नकळतमध्ये मोबाईलमध्ये कैद झाली आहेत.

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम मध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना प्राण गमवावे लागले. या दहशतवाद्यांच्या शोधासाठी युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे. तसेच, भारताने पाकिस्तानविरुद्ध आक्रमक पावले उचलण्यास सुरूवात केली आहे.



तीन संशयितांची रेखाचित्रे पोलिसांनी प्रसिद्ध केली आहेत. शिवाय, चार दहशतवाद्यांची छायाचित्रे देखील समोर आली आहेत. याशिवाय, घटनेची अनेक चित्रफिती दररोज समोर येत आहेत. यामध्ये दहशतवादी कशाप्रकारे कौर्य करत आहेत, हे स्पष्टपणे दिसत आहेत. अशातच दोन दहशतवाद्यांची छायाचित्रे देहूरोड येथील एका नागरिकाच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.

देहूरोडमधील रहिवासी असलेले श्रीजीत रमेशन हे

(पुढील मजकूर पान ८ वर)

# उमळवाड येथे पहाटे दरोडा; चाकूचा धाक दाखवून ऐवज लंपास

**केसरी वृत्तसेवा**

**जयसिंगपूर :** उमळवाड (तालुका शिरोळ) येथे माळभाग उपाध्ये मळा रोड येथे घरात घुसून दरोडा टाकण्यात आला. पती-पत्नीला चाकूचा धाक दाखवून रोख रक्कम व सोने लंपास करण्यात आले.जयसिंगपूर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन श्वानपथकास पाचारण करून तपासाच्या दृष्टीने प्रयत्न केले. मात्र या घटनेची नोंद शनिवारी दुपारपर्यंत पोलीस ठाण्यात झाली नव्हती.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली अधिक माहिती अशी, उमळवाड येथे माळभाग वसाहतीत राहत असलेल्या खुतबुद्दीन बुरान जमादार हे पत्नी समवेत राहतात. जयसिंगपूर येथील एका खासगी कंपनीत लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करीत असलेल्या कुतुबुद्दीन यांनी कामगार पगारासाठी ९० हजार रुपये तिजोरीत ठेवले होते.पत्नी सलमा व खुदबुद्दीन हे दोघेच घरात राहतात. गुरुवारी रात्री नेहमीप्रमाणे ते झोपी गेले असता शुक्रवारी पहाटे अडीचच्या दरम्यान दरवाज्याची

(पुढील मजकूर पान ८ वर)

## इराणमधील बंदरात स्फोट; पाच ठार, ७०० जखमी

**तेहरान :** दक्षिण इराणमधील एका बंदरात शनिवारी भीषण स्फोट झाला. यामध्ये पाच जण ठार झाले असून, ७०० हून अधिक जखमी झाले आहेत, अशी माहिती देशाच्या बचाव पथकाचे प्रमुख बाबक महमूदी यांनी सरकारी दुरचित्रवाहिनी दिली. गृह मंत्रालयाने या घटनेची चौकशी सुरू केली आहे, असेही ते म्हणाले.

जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असून मृतांचा आकडा

(पुढील मजकूर पान ८ वर)

# आणखी तीन संशयित दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त

**श्रीनगर :** पहलगाममधील नरसंहाराच्या पार्श्वभूमीवर काश्मीर खोऱ्यात आणखी तीन संशयित दहशतवाद्यांची घरे अधिकाऱ्यांनी उद्ध्वस्त केली. आतापर्यंत पाच दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त करण्यात आली.

पहलमागममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार केला होता. यामध्ये २६ जणांना आपले प्राण गमवावे लागले होते. यात एक परदेशी पर्यटक, दोन स्थानिकांचा समावेश होता. तर, अन्य २३ विविध राज्यांतून पर्यटनासाठी आले होते.

शुक्रवारी रात्री दक्षिण काश्मीरमधील पुलवामा, शोपियान आणि कुलगाम जिल्ह्यात कथित दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त करण्यात आली. त्याआधी, पहाटेच्या सुमारास पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मुख्य संशयितासह लष्कर-ए-तोयबाच्या दोन दहशतवाद्यांची घरे स्फोटकांनी स्फोट घडवून उडविण्यात आली होती.

पुलवामा जिल्ह्यातील मुरान परिसरातील अहसान उल हक शेख याचे घर शुक्रवारी रात्री

(पुढील मजकूर पान ८ वर)

ताज्या घडामोडींसाठी वाचा
Kesari E-Paper Portal
http://www.dailykesari.com
http://www.dailykesari.com/epapaer/

| सोने | चांदी |
|---|---|
| सांगली ९६,८०० | ९९,८०० |

**अंडी भाव**

राष्ट्रीय अंडी समन्वय समिती (मिरज) दि. २७ एप्रिल २०२५
४६० मुंबई (नेकरेट) - मिरज फाँड्री रेट (किरकोळ ६० रु. डझन)
ब्रॉयलर जिवंत पक्षी नंदा ग्रुप ११८ रुपये प्रतिकिलो

**तापमान**

| | |
|---|---|
| सांगली | $37^{\circ}$ C |
| कोल्हापूर | $37^{\circ}$ C |

**शेअर बाजार**

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७९,२१२.५३ |
| निफ्टी | २४,०३९.३५ |
| युएस डॉलर | ८५.३७ |
| युरो | ९७.०६ |

# जगदाळे, गनबोटे कुटुंब अद्याप धक्क्यातच

## मुख्यमंत्री फडणवीस यांची सांत्वनपर भेट

**पुणे :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात संतोष जगदाळे व कौस्तुभ गनबोटे यांचे प्राण गेले. एका क्षणात कुंटुंबीयांचा क्षणात आनंद हिरावला गेला. ही दोन्ही कुंटुबे अद्यापही धक्क्यात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी या दोन्ही कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेताना त्यांना दिलासा दिला.

पहलगामला पर्यटनासाठी गेलेले संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गनबोटे यांचा दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला. यावेळी दोन्ही कुंटुबीयांनी दहशतवाद्यांच्या थरार स्वत: अनुभवला आहे. त्या धक्क्यातून ही कुंटुबे अद्याप सावरली नाहीत.

शहर व परिसरातील अनेक जण जगदाळे आणि गनबोटे कुंटुबीयांची भेट



घेऊन त्यांचे सांत्वन करत आहेत.

राजकीय, सामाजिक क्षेत्रातील लोकांचाही समावेश आहे. त्यामुळे जगदाळे आणि गनबोटे यांच्या निवासस्थानी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कुटुंबीयांच्या तोंडून हल्ल्याचा थरार

### पीडित कुटुंबीयांना भेटून निशब्द झालो

कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे यांच्या कुंटुबीयांची भेट घेतली. त्यांनी पहलगाममधील सांगितलेला थरार ऐकून निशब्द झालो. असावरी यांनी घटनास्थळावरील सांगितलेला थरार ऐकून मन हेलावून गेले. गनबोटे, जगदाळे कुटुंबासोबत जे झाले ते अनाकलनीय आहे. या घटनेमुळे दहशतवाद्यांशी लढण्याचा निर्धार अधिक घट्ट झाला आहे. या दोन्ही कुटुंबामागे राज्य सरकार आहे. त्यांना लागेल ती मदत करण्यास सरकार तयार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

(पुढील मजकूर पान ८ वर)

## नियंत्रण रेषेवर पाकिस्तानकडून गोळीबार

**श्रीनगर/ नवी दिल्ली :** पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवर सलग दुसऱ्या दिवशी विनाकारण गोळीबार केला. त्याला भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले, अशी माहिती लष्करी सूत्रांनी शनिवारी दिली.

पहलगाममधील नरसंहारानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. २२ एप्रिल रोजी

(पुढील मजकूर पान ८ वर)



# मण्यार चावलेल्या रुग्णाचा डॉ.राजकुमार खंबे यांनी वाचवला जीव

## सिनर्जी हॉस्पिटलमध्ये घडली आश्चर्यकारक घटना : रुग्ण सहा तासांनी पोहोचला होता हॉस्पिटलमध्ये

केसरी वृत्तसेवा
मोहन वाटवे/मिरज


राजकुमार खंबे

अत्यंत विषारी समजला जाणारा मण्यार साप २२ वर्षांच्या एका तरुणास चावला. साप चावल्याची ना ओळख, ना पुरावा, ना निशाण. रुग्ण सहा तासांनी सिनर्जी हॉस्पिटलमध्ये पोहोचला. नातेवाईकसुद्धा त्या तरुणास काय झालेय याबद्दल अनभिज्ञ. रुग्ण बेशुद्ध असल्याने व्हेंटिलेटरवर गेला. तरीही सिनर्जी हॉस्पिटलचे मेडीसिन विभागाचे डॉ. राजकुमार खंबे यांनी शर्थीचे प्रयत्न करून त्या तरुणाचे प्राण वाचविले.

प्राथमिक उपचार – तपासण्या – निरीक्षण – निदान – निष्कर्ष, सोबत सततचे उपचार सुरूच ठेवत मण्यार हा विषारी सापच चावल्याचा निष्कर्ष डॉ. खंबे यांनी काढला. आवश्यक ते उपचार करीत चौदाव्या दिवशी रुग्ण व्हेंटिलेटरवरून बाहेर काढत त्याला आश्चर्यकारकरीत्या वाचविण्यात त्यांना यश आले.

एके दिवशी हॉस्पिटलमध्ये बेशुद्ध अवस्थेतील बावीस वर्षांचा तो तरुण रुग्ण दाखल झाला. रात्री शेतात काम करताना तो बेशुद्ध झालेला पाहून नातेवाईकांनी त्याला रुग्णालयात दाखल केले होते. त्याच्या तोंडाला ना फेस आला होता, ना विषबाधेची कोणती लक्षणे दिसत होती. रुग्णाचा कोणताही इतिहास माहीत नव्हता. रुग्णाच्या शरीरावर कोणत्याही खाणाखुणा दिसत नव्हत्या. परंतु डॉ. खंबे यांनी प्राथमिक उपचारास सुरुवात केली. दोन दिवसात काही बदल, सुधारणा दिसू लागली. सपोर्टिव्ह केअर म्हणून तिसऱ्या दिवशी त्याला व्हेंटिलेटरवर दाखल करावे लागले होते. कारण तिसऱ्या दिवशी पुन्हा त्याची शुद्ध खालावली व हालचाल मंदावली होती. त्यामुळे रुग्णाला व्हेंटिलेटरशिवाय पर्याय नव्हता. आयसीयूमध्ये व्हेंटिलेटरवर असताना त्या रुग्णाला ताप येत होता. सात दिवस त्याच्यावर उपचार सुरू होते. या रुग्णाचे स्नायू कमकुवत झाले होते. कारण सापाचे विष सर्व नसांना डॅमेज करते. तसेच सुधारणा व्हायला वेळ लागतो. नसा आणि स्नायू यांचे मोठे नुकसान झाले होते. श्वास घेण्याचे स्नायूही कार्यरत नव्हते. त्यामुळे व्हेंटिलेटरची गरज निर्माण झाली होती. पहिल्या तीन दिवसांतच डॉ. खंबे यांनी त्याला अँटीस्नेक व्हेनमचे दहा – वीस – तीस या क्रमाने तीस डोस दिले. वैद्यकीय निदान पक्के झाल्यानंतर हे डोस देण्यात आले होते. त्यानंतर चौदाव्या दिवशी त्या रुग्णाला शुद्ध आली आणि त्याचे बोलणे सुरू झाले. त्याचा जीवही वाचला आणि रुग्ण पूर्ववत बरा होऊ लागला. आठव्या दिवसापासून चौदाव्या दिवसापर्यंत डॉ. खंबे यांनी दिलेल्या न्युरोपॅथी कन्सेप्टनुसार पुढील उपचार यशस्वी केले.

### निदान पक्के, तरीही रुग्णाकडून केली खात्री

डॉ. खंबे यांनी सुरुवातीपासूनच साप चावल्याचे प्राथमिक निदान करीत अँटीडोट दिले होते. रुग्ण चौदाव्या दिवशी थोडे बोलायला सुरुवात झाल्यानंतर डॉ. खंबे यांनी रुग्णास मण्यार सापाचे चित्र दाखवून प्रश्न विचारले असता, असाच साप होता असे त्यांनी सांगितले. तेव्हा डॉक्टरांनी केलेले निदान आणि उपचार दोन्हीही सुरुवातीपासूनच योग्य दिशेनेच झाल्याचे सिद्ध झाले.

### विषारी साप चावल्यास काय करावे?

डॉ. खंबे म्हणाले, कोब्रा, मण्यार, घोणस, फुरसे अशा विषारी जातीचे साप चावल्यावर शक्य तितक्या लवकर अतिदक्षता विभागात दाखल करावे. चावलेल्या ठिकाणाच्या मागे बांधणे, चावलेल्या ठिकाणी कापणे वगैरे प्रकार धोकादायक ठरून काही वेळा तो अवयव काढावासुद्धा लागू शकतो. विषारी सापास काही रुग्ण पकडून, मारून अथवा त्याचा तुकडा घेऊन हॉस्पिटलमध्ये येतात. त्याच्याऐवजी त्याचा नीट काढलेला फोटोसुद्धा पुरेसा आहे. अतिदक्षता विभागाची सोय असलेल्या हॉस्पिटलमध्ये लवकर उपचारास प्रारंभ हीच खरी दक्षता आहे.

**मण्यार चावल्याचे का कळले नाही?**

मण्यार हा अत्यंत विषारी जातीचा साप असून, या सापाने चावलेले संबंधितास कळत नाही. शिवाय ते लगेच दुखतही नाही. उलट चावलेला भाग बधीर झालेला असतो. त्यामुळे मण्यार जातीचा साप चावल्याचे रुग्णास व त्याच्या नातेवाईकास माहिती नसल्यास अथवा त्या मण्याराला कुणीच पाहिले नसल्यास ओळखणे अवघड बनते. कोणतेच पुरावे नसल्यास आणि रुग्ण बेशुद्ध अवस्थेत असल्यास डॉक्टरांनाही कारण ओळखणे मुश्किल बनते. माहिती, फोटो, चित्र यावरून पुढे विचारपूस करून अंतिम शिक्कामोर्तब करावे लागते.

**मण्यार चावल्यानंतरची लक्षणे**

मण्यार साप चावल्यानंतर न्यूरो मस्क्युलर जंक्शन, स्नायू व मज्जासंस्थेवर वेगाने परिणाम सुरू होतो. स्नायूंची हालचाल मंदावते. बोलणे थांबते, जीभ अडखळू लागते. श्वास घेण्यास त्रास होतो. अगदी डोळे उघडताना पापण्यातसुद्धा जडपणा येतो.

**मण्यारसारख्या विषारी सापाच्या दंशानंतर काय करावे?**

मण्यारसारखा विषारी साप चावल्यानंतर सुरुवातीला स्थानिक स्तरावर दाखवण्यासोबतच शक्य तितक्या लवकर अतिदक्षता विभागाची सुविधा असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये रुग्णास शिफ्ट करावे. सापाचे विष किती प्रमाणात शरीरात गेले आहे? त्याची तीव्रता किती आहे? तसेच चावा घेतल्याची जागा आणि मज्जासंस्थेपर्यंतचे अंतर या सर्व बाबींवर त्याचा जीव वाचणे अथवा काही काळानंतर योग्य उपचाराअभावी जीव जाणे अवलंबून राहते.

**शेतात शेतकरी अचानक बेशुद्ध पडण्याची विविध कारणे**

शेतामध्ये काम करत असताना दिवसभरात अथवा रात्री शेतकरी अचानक बेशुद्ध पडल्यास त्याची विविध कारणे असू शकतात. हिटस्ट्रोक, हृदयविकार, इन्फेक्शन्स, सर्पदंश, मेंदूचे इन्फेक्शन्स, विषारी औषध पिऊन, साखर कमी–जास्त होऊन या व अशा अनेक कारणांमुळे तरुण अथवा प्रौढ रुग्ण शेतात बेशुद्ध पडू शकतात.


मिरज : श्री स्वामी समर्थ केंद्र येथे विकासकामांचे भूमिपूजन करताना माजी पालकमंत्री आमदार डॉ. सुरेश खाडे.

# स्वामी समर्थ केंद्राच्या विकासकामांचे आ. सुरेश खाडे यांच्याहस्ते भूमिपूजन

केसरी वृत्तसेवा

**मिरज :** मिरजेतील प्रभाग क्रमांक सातमध्ये वंटमुरे कॉर्नर जवळ आरवटगी पेट्रोल पंपाच्या मागे असलेल्या श्री स्वामी समर्थ केंद्रात पेव्हिंग ब्लॉक्स बसविणे व संरक्षक भिंत बांधणे या विकासकामांचा प्रारंभ माजी पालकमंत्री आमदार डॉ. सुरेश खाडे यांच्याहस्ते शनिवारी सकाळी झाला. या कामासाठी आमदार खाडे यांनी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. यामुळे श्री स्वामी समर्थ भक्तांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण आहे.

या भूमिपूजन कार्यक्रमास ज्येष्ठ नेते सुरेश आवटी, माजी नगरसेवक गणेश माळी, माजी महापौर संगीता खोत, माजी उपमहापौर आनंदा देवमाने, माजी नगरसेवक पांडुरंग कोरे, माजी नगरसेविका गायत्री कुल्लोळी, भाजप जिल्हा सरचिटणीस मोहन वाटवे, भाजप मंडल अध्यक्ष चैतन्य भोकरे, अभिजित गौराजे, मयूर नाईकवाडे, अनिता हारगे, भाजप पदाधिकारी बाबासाहेब आळतेकर, जयगोंडा कोरे, महेश धयारे, शशिकांत वाघमोडे, जितेंद्र ढोले, महेश फोंडे, गजेंद्र कुल्लोळी, विठ्ठल खोत, सूर्यकांत शेगणे, लतिका शेगणे, राजू माने, वैभव यमगर, अजिंक्य हंबर, उमेश हारगे, अनघा कुलकर्णी, रूपाली देसाई, रूपाली गाडवे यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


सांगली : संत निरंकारी मिशनच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात उपस्थित रक्तदाते.

# ‘निरंकारी’च्या शिबिरात ३६९ दात्यांनी केले रक्तदान

केसरी वृत्तसेवा

**मिरज :** प्रतिवर्षाप्रमाणे संत निरंकारी मिशनमार्फत २४ एप्रिल रोजी बाबा गुरबचनसिंहजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ‘मानव एकता दिवस’ आयोजित करण्यात आला. त्यानिमित्त संत निरंकारी सत्संग भवन सांगली येथे आयोजित केलेल्या शिबिरात ३६९ भाविकांनी रक्तदान केले.

यावर्षी संत निरंकारी चैरिटेबल फाऊंडेशन मार्फत पूर्ण देशभरात सुमारे ५००हून अधिक शाखांमध्ये रक्तदान शिबिर पार पडले. संत निरंकारी हेल्थ सिटीच्या मेडिकल डायरेक्टर गीतिका दुग्गल यांनी सांगितले, की देशभर आयोजित रक्तदान श्रृंखलेअंतर्गत सुमारे ३०,००० यूनिट रक्त संकलित करण्यात आले.

मानव एकता दिवसाच्या निमित्ताने सांगलीतही विशेष सत्संग समारोह झाले. सायंकाळी सात ते रात्री नऊ या वेळेत प. आ. नंदकुमार झांबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विशाल सत्संग झाला. तेथे सांगली, मिरज, नरवाड, जत, कवठेमहांकाळ, सलगरे, देशिंग इत्यादी ठिकाणांहून हजारो संत महापुरुष उपस्थित होते.

# स्व. आर. आर. पाटील आंबा महोत्सव आजपासून

## सभापती युवराज पाटील यांची माहिती

केसरी वृत्तसेवा

**तासगाव :** तासगावचा केशर, देवगड, रत्नागिरीचा हापूस व पायरी अशा अनेक प्रकारच्या आंब्यांचा स्वर्गीय आर. आर. पाटील आंबा महोत्सव तासगाव येथे प्रथमच भरत आहे. हा महोत्सव २७ एप्रिल ते १ मेपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत होणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे व कृषी उत्पन्न बाजार समिती तासगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मार्केट यार्ड तासगाव येथे याचे आयोजन केले आहे, अशी माहिती सभापती युवराज पाटील यांनी दिली.

उत्पादक ते ग्राहक असा थेट व्यवहार यात होणार आहे. आंबा उत्पादक शेतकरी यांना याचा लाभ होणार आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

ते म्हणाले, तासगाव येथे प्रथमच आंबा महोत्सव खास अक्षय्य तृतीया सणानिमित्त आयोजित केला आहे. तासगाव तालुक्यात केशर आंबा उत्पादन क्षेत्रात झपाट्याने होत असलेली वाढ लक्षात घेता आंबा विक्रीसाठी स्थानिक बाजारपेठ निर्मिती, शेतकरी ते ग्राहक चांगल्या प्रतिचा केशर, हापूस, पायरी आंबा ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहे. आंबा उत्पादकांना त्यांच्या हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणे, ग्राहकांना किफायतशीर दरात व गुणवत्तापूर्ण आंबेखरेदी करता यावेत, उत्पादक ग्राहक यांचे संबंध दृढ व्हावेत, डुप्लिकेट हापूसच्या विक्रीला आळा बसावा, ग्राहकांना ओरिजनल हापूस व केशरची ओळख व्हावी, असे अनेक उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा महोत्सव आयोजित केला आहे.

# शासनाने ४४ वर्षांपासून ताब्यात घेतलेल्या जमिनीच्या भाड्यापासून शेतकरी वंचित

केसरी वृत्तसेवा

**शिराळा :** शासनाने ४४ वर्षांपासून ताब्यात घेतलेल्या जमिनीचे शेतकऱ्यांना भू भाडे व भूसंपादन रकमेवर देय असणारे व्याज देखील शेतकऱ्यांना मिळालेले नाही. या संदर्भात माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे– पाटील यांची मुंबई येथे भेट घेऊन मागणी केली.

मंत्री विखे–पाटील यांनी या महत्त्वाच्या प्रश्नासंदर्भात वारणा प्रकल्पाच्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची मुंबईत मंत्रालयामध्ये बैठक बोलावून शेतकऱ्यांना न्याय देणार असल्याचे सांगितले.


मुंबई : मंत्री राधाकृष्ण विखे– पाटील यांच्याशी वारणा डाव्या कालव्याच्या जमिनीबाबत चर्चा करताना शिवाजीराव नाईक.

शिराळा तालुक्यातील वारणा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे ५३ ते ५५ किलोमीटरचे काम सुरू असून, संबंधित पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांच्या जमिनी सन १९७९ सालापासून ताब्यात घेतल्या असून, शासन निर्णयानुसार जमिनीची भाडेपट्टी शेतकऱ्यांना मिळालेली नाही. भूसंपादन रकमेवर देय असणारे व्याज देखील शासनाकडून मिळालेले नाही. ४४ वर्षांपासून या जमिनी शासनाच्या ताब्यात आहेत. हा शेतकऱ्यांवर फार मोठा अन्याय आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला असून, प्रकल्पाच्या कामास प्रचंड विरोध होत आहे. प्रकल्पाचे काम सुरू करण्यापूर्वी बाधित शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी जलसंपदांना विभाग कृष्णा खोरे विकास महामंडळाची वरिष्ठ अधिकारी व भूसंपादन अधिकारी तसेच बाधित झालेले शेतकरी यांची एकत्रित बैठक घेऊन या प्रश्नासंदर्भात शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी मंत्रालय स्तरावर बैठक बोलवण्याची मागणी शिवाजीराव नाईक यांनी केली.

मंत्री विखे–पाटील यांनी शिवाजीराव नाईक यांनी दिलेल्या पत्राची सविस्तर माहिती घेऊन चर्चा केली. लवकरच मंत्रालय स्तरावर जलसंपदा विभागाचे कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक पुणे व अधिकारी व भूसंपादन अधिकारी यांच्याबरोबर बैठक घेऊन शेतकऱ्यांना न्याय देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# खरसुंडी खिलार जनावरांच्या यात्रेत सात कोटींची उलाढाल

केसरी वृत्तसेवा

**आटपाडी :** खरसुंडी (ता. आटपाडी) येथील सिद्धनाथ देवाच्या यात्रेनिमित्त जनावरांची यात्रा मोठ्या प्रमाणात भरली होती. या यात्रेमध्ये जनावरे खरेदी–विक्री व्यवहारातून ७ कोटीची उलाढाल झाल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संतोष पुजारी यांनी दिली.

खरसुंडी येथील श्री सिध्दनाथ देवाची खिलार जनावरांची चैत्री यात्रा २१ ते २६ एप्रिल अखेर घाणंद चिंचाळे रस्त्यावर भरविण्यात आली होती. या यात्रेमध्ये बारा हजार जनावरांची आवक झाली. यात्रेमध्ये जनावरांच्या खरेदी–विक्री व्यवहारातून ७ कोटीची उलाढाल झाली. यात्रेमध्ये बाजार समितीने शेतकरी, व्यापारी व जनावरांना टँकरद्वारे स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला होता. तसेच आवश्यक त्याठिकाणी पुरेशी वीज


खरसुंडी येथे खिलार जनावरांची भरलेली यात्रा.

दिव्यांची व्यवस्था केली होती. जनावरांच्या बाजारामध्ये चोरीच्या घटना घडू नयेत यासाठी बाजार समितीने सीसीटीव्हीची व्यवस्था आणि पार्किंगसाठी उपबाजार आवाराची जागा उपलब्ध करून दिली होती. तसेच जनावरांच्या उपचारासाठी वैद्यकीय पथक यात्रा स्थळी उपलब्ध करून देण्यात आले होते.

यात्रा कालावधीमध्ये बाजार समितीचे सभापती संतोष पुजारी यांनी जनावरांच्या यात्रेमध्ये वेळोवेळी भेटी देऊन बाजार समितीने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची माहिती घेतली. शेतकरी, व्यापारी यांच्याशी चर्चा करून पाणी पुरवठा, लाईट इत्यादी सुविधांची ोणतीही अडचण येणार नाही याबाबत सचिव व कर्मचारी यांना वेळोवेळी सूचना दिल्या.

यात्रा कालावधीमध्ये बाजार समिती उपसभापती सुनील सरक व संचालक सुबराव पाटील, भगवान पाटील, शंकर भिसे यांनी वेळोवेळी भेटी देऊन दिलेल्या सुविधांबाबत माहिती घेतली. बाजार समितीने पुरेशा सुविधा उपलब्ध केल्यामुळे शेतकरी, व्यापारी व दलाल यांनी समाधान व्यक्त केले. तसेच सरपंच धोंडीराम इंगवले यांनी जनावरांच्या यात्रेमध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी टँकर उपलब्ध करून दिला होता. ग्रामपंचायत चिंचाळेचे सरपंच संजय कदम व माजी सरपंच गजानन गायकवाड यांनी यात्रा कालावधीमध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी सहकार्य केले.

तसेच खरसुंडी व चिंचाळे येथील ग्रामस्थ यांचे यात्रा कालावधीमध्ये बाजार समितीस मोलाचे सहकार्य लाभले. जनावरांचा बाजार, यात्रा स्थळावर सर्व सुविधा उपलब्ध केल्यामुळे यात्रा सुरळीत पार पाडली. पोलिसांनी बाजार कालावधीत चोख बंदोबस्त ठेवला होता.

# थायलंड पोलिसांचे विमान कोसळले

**बँकॉक :** थायलंडमधील बीच शहराजवळ शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास एक विमान समुद्रात कोसळले. या दुर्घटनेत सहा पोलिसांचा मृत्यू झाला.

रॉयल थाई पोलिसांचे प्रवक्ते आर्चायोन क्रेथोंग म्हणाले, मवायकिंग डीएचसी–६ ट्विन ऑटरफविमान हुआ हिन जिल्ह्यात पॅराशूट प्रशिक्षणाच्या तयारीसाठी चाचणी घेत होते. उड्डाणानंतर काही वेळातच हे विमान कोसळले. यात पाच पोलिसांचा जागीच मृत्यू झाला. तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात येते. हवाई दलाचे अधिकारी विमानाच्या ब्लॅक बॉक्समधील डेटासह पुरावे गोळा करत आहेत. या विमान दुर्घटनेची एक चित्रफित प्रसारित झाली आहे.

# कसबे डिग्रजमध्ये उद्यापासून श्री बृहत् गणधर वलय महामंडल विधान प्रारंभ

केसरी वृत्तसेवा

**कसबे डिग्रज :** श्री १००८ भ. आदिनाथ दिगंबर जिन मंदिर व श्री १००८ भ. शांतिनाथ दिगंबर जिन मंदिर कसबे डिग्रज येथे २५ समवशरण सहित ऐतिहासिक श्री बृहत् गणधर वलय महामंडल विधान व विश्वशांती महायज्ञ सोहळा २८ एप्रिल ते ४ मेपर्यंत होणार आहे.

त्या निमित्ताने मंगल निनाद, यजमानांची सवाद्य मिरवणूक, जलकुंभ मिरवणूक, कंकण बंधन, ध्वजारोहण, श्री गणधर वलय विधान प्रारंभ, गणधर वलय बीजाक्षर पंचामृत अभिषेक, शांतिधारा, होम हवन विधी, श्रीपीठ यंत्र आराधना, यागमंडल विधान, अंकुरारोपण,


भगवान आदिनाथ


भगवान शांतिनाथ

मंगल प्रवचन, मौजीबंधन संस्कार, रत्नवृष्टी, सायंकाळी मिरवणूक सवाल, जाप्य, आरती, सवाल, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. श्रावक–श्राविकांनी या महामंडल विधानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त दिगंबर जैन समाज व मंदिर पंच कमिटी, वीर महिला मंडळ, वीर सेवा दल, सम्यक्त्व धारिणी महिला मंडळ, शांतिसागर पाठशाळा, शांतिनाथ महिला मंडळ कसबे डिग्रज यांनी केले आहे.

# झरे पंचक्रोशी जनता विद्यालयाचे शिष्यवृत्तीत यश

केसरी वृत्तसेवा

**आटपाडी :** झरे पंचक्रोशी जनता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवले. इ. ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने जाहीर केला. यामध्ये झरे पंचक्रोशी जनता विद्यालयातील इ. ५वी व ८वीतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. इ. ५ वीतील विजयानंदनी पवार, स्वराली यादव, श्रेयांश बनगर, आरव पडळकर, प्रतीक पडळकर, वैभव पाटील, इ. ८ वीतील रसिका काळेल, आर्या महामुनी यांनी यश संपादन केले.

# न्यूयॉर्क टाइम्सला फटकारले

**वॉशिंग्टन :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा जगभरातून निषेध होत आहे; पण अमेरिकन वृत्तपत्र न्यूयॉर्क टाईम्सने हल्लेखोरांचे वर्णन केवळ अतिरेकी आणि बंदूकधारी असे केले होते. अमेरिकन सरकारने या वृत्तातील न्यूयॉर्क टाइम्सची चूक दुरूस्त करून त्यांना फटकारले. हा स्पष्टपणे दहशतवादी हल्ला होता, अशी दुरूस्ती केली. न्यूयॉर्क टाइम्स वास्तवापासून खूप दूर असतो, असेही समितीने त्यामध्ये म्हटले आहे.

लोकमान्य ट्रस्टचे हे पत्र मुद्रक, प्रकाशक, ● **संपादक : डॉ. दीपक जयंत टिळक,** यांनी लोकमान्य ट्रस्ट, ६७–७०, वसंतदादा औद्योगिक वसाहत, सांगली येथे छापून सांगली, कोल्हापूर, बेळगाव येथून एकाचवेळी प्रसिद्ध केले. **कार्यकारी संपादक : डॉ. रोहित दीपक टिळक.** ● **मुख्य कार्यालय :** ६७–७०, वसंतदादा औद्योगिक वसाहत, सांगली ४१६ ४१६, (०२३३) २३१०८३८, २३१०७३७, ● **कोल्हापूर कार्यालय :** श्रीनिवास रेसिडेन्सी, फ्लॅट नं. ५०२, डबल आईस फॅक्टरीसमोर, बेलबाग, मंगळवार पेठ, कोल्हापूर. (०२३१) २६४४६६४, ● **पुणे कार्यालय :** ५६८, नारायण पेठ, पुणे–३०. (०२०) २४४५९२५०, ● **मुंबई कार्यालय :** सरदारगृह, टिळक मार्ग, मुंबई–२. (०२२) २२०८२५०३, ● **नवी दिल्ली कार्यालय :** २/१६, आय.एन.एस. बिल्डिंग, रफी मार्ग, नवी दिल्ली ११०००१. (०११) २३७१४१४९. ● E-mail : sanglikesari@gmail.com ● **जाहिरातीसाठी** E-mail : dmkadvt@gmail.com

# खरसुंडी येथे सिद्धनाथांच्या चैत्र यात्रेत सासनकाठी, पालखी सोहळा उत्साहात

केसरी वृत्तसेवा

**आटपाडी :** 'चांगभलं'च्या गजरात व गुलाल-खोबऱ्याच्या उधळणीत खरसुंडी (ता. आटपाडी) येथील श्री सिद्धनाथांच्या चैत्र यात्रेत सासनकाठी व पालखी सोहळा तसेच रथोत्सव उत्साहात झाला.

द्वादशीच्या मुहूर्तावर सासनकाठी व पालखी सोहळा झाला. त्यासाठी गावाच्या पाचही रस्त्यांवरून भाविकांचा सकाळपासून ओघ सुरू होता. सकाळी नित्योपचार झाल्यानंतर श्रींच्या उत्सवमूर्तीची सदरेवरील बैठी तर गाभाऱ्यात अश्वारूढ पूजा बांधण्यात आली होती. त्यानंतर हजारो भाविकांच्या उपस्थितीत धुपारती झाली. नंतर गावोगावच्या सासनकाठ्या मुख्य मंदिरात दाखल होण्यास सुरुवात झाली. मंदिराच्या आवारात त्या सासनकाठ्या पारंपरिक वाद्यांच्या तालावर नाचवल्या जात होत्या. तर उपस्थित भाविक गुलाल-खोबऱ्याची उधळण करीत होते. दुपारी बारानंतर भाविकांनी समूहाने मानाच्या आरत्या व नैवेद्य दाखवण्यास प्रारंभ केला.

दुपारी दोननंतर चिंचाळे येथील गायकवाड मानकरी यांचे मुख्य मंदिरात आगमन झाले. त्यानंतर देवस्थानचे प्रमुख मानकरी हर्षवर्धन राजेंद्र देशमुख यांचे गावाच्या वेशीवर आगमन झाले. त्यांना धुपारतीसह मंदिरात आणण्यात आले. त्यांनी पालखीचे दर्शन घेतल्यानंतर मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली. त्यापूर्वी विठ्ठलापूरचे बाड व धावडवाडीच्या मुस्लिम बांधवांनी एकत्रित हातात सिंधीच्या फोका घेऊन नैवेद्य दाखवला.

पालखी सोहळा नगरखान्यातून मुख्य पेठेत दाखल झाल्यानंतर भाविकांनी गुलाल-खोबऱ्याची प्रचंड उधळण केली. पालखी सोहळा जोगेश्वरी मंदिरात आल्यानंतर त्या ठिकाणी मानपान करण्यात आला. त्यानंतर मनाच्या टकऱ्या गडशाने देवाच्या लोखंडी सासनकाठ्यांना टक्कर दिल्यानंतर पालखीचा परतीचा प्रवास सुरू झाला. पालखी मुख्य मंदिरात आल्यानंतर सोहळ्याची सांगता झाली. त्यानंतर मंदिरामध्ये श्रीफळ वाढवण्यास प्रारंभ झाला.

शनिवारी त्रयोदशी दिवशी रथोत्सवानिमित्ताने भाविकांचा ओघ कायम होता. दुपारी दोन वाजता आकर्षक फुलांनी सजवलेल्या पालखी रथाचे मुख्य मंदिरातून प्रस्थान झाले. पालखी रथ पेठेत आल्यानंतर भाविकांनी 'चांगभलं'च्या गजरात गुलाल-खोबऱ्याची उधळण केली. भाविक उत्साहात रथ ओढत होते. मुख्यपेठेतून रथ जोगेश्वरी मंदिराजवळ पोहोचला व त्यानंतर मुख्य मंदिरात परत आला. पालखी सोहळ्यासाठी उपस्थित राहू न शकलेल्या भाविकांनी रथोत्सवाला हजेरी लावली होती. आज यात्रेतील सरता रविवार असल्याने भाविकांची गर्दी होण्याची शक्यता आहे.



खरसुंडी येथील सिद्धनाथ देवाच्या यात्रेत भाविकांची झालेली गर्दी.

### स्वयंसेवी संस्थांनी केले पाणी, महाप्रसाद वाटप

यात्रेमध्ये भाविकांच्या सोयीसाठी स्वयंसेवी संस्था, दानशूर भाविकांनी मोठ्या प्रमाणावर पिण्याचे पाणी, महाप्रसादाचे वाटप केले. यात्रेच्या यशस्वीतेसाठी श्रीनाथ देवस्थान ट्रस्ट, ग्रामपंचायत, कृषी उत्पन्न बाजार समिती, महसूल व पोलीस प्रशासनाने परिश्रम घेतले.

# लेझर लाईटमुळे तरुणाच्या डोळ्याला इजा

## पोहाळे तर्फे बोरगावातील घटना

केसरी वृत्तसेवा

**कळे :** जोतिबाची यात्रा झाली की ग्रामीण भागात यात्रा सुरू होतात. अनेक गावात यात्रेनिमित्त गाडा किंवा पालखीच्या समोर डॉल्बी लावण्यासाठी तरुण मंडळामध्ये कमालीची ईर्षा पाहायला मिळत आहे. डॉल्बीच्या कर्कश आवाजाबरोबर आकर्षणाचा केंद्र ठरलेल्या लेझर लाईटमुळे पोहाळे तर्फे बोरगाव (ता. पन्हाळा) येथील हर्षद निवास पाटील या बावीस वर्षीय तरुणाच्या डोळ्याला गंभीर जखम होऊन रक्तस्राव झाला. त्यामुळे त्याला एका डोळ्याने दिसायचे बंद झाल्याने उपचारासाठी त्याला कोल्हापुरातील खासगी दवाखान्यात दाखल केले आहे.

> शासनाने बंदी घातली असतानाही मंडळातील असणाऱ्या ईर्षेमुळे ग्रामीण भागात डॉल्बी सोबत लेझर लाईट मोठ्या प्रमाणात लावली जाते. या घातक असलेल्या लाईटमुळे एखाद्याचा डोळा जाऊ शकतो, त्यामुळे पोलिसांनी अशा मंडळावर कडक कारवाई करायला हवी.
>
> – **निवास पाटील,** माजी ग्रामपंचायत सदस्य, पोहाळे तर्फे बोरगाव.

डोळ्यांसाठी अत्यंत घातक ठरलेल्या लेझर लाईटमुळे यापूर्वी देखील अनेक वाईट घटना घडल्या होत्या. गेल्या दोन ते तीन वर्षात याचा वापर मोठ्या प्रमाणात मिरवणुकीत वाढला आहे. पोहाळे तर्फे बोरगाव येथील बावीस वर्षीय हर्षद हा पालखीची मिरवणूक बघायला गेला होता. यावेळी लेझर लाईट त्याच्या डोळ्यामध्ये गेल्याने त्याची नजर कमजोर झाली असून, त्याला अचानक दिसायचे बंद झाले. डोळ्यातील पडदा तपासला असता, डोळ्याचा सूक्ष्म भाग असलेला मॅक्युलममध्ये लेझर किरण गेल्याने रक्तवाहिनी फुटली होती. यामुळे रक्तस्राव झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

लेझरमुळे डोळ्यांना दुखापत होण्याचे प्रमाण गेल्या तीन ते चार वर्षात वाढले आहे. लेझरचे किरण हे तीव्र असतात आणि ते डोळ्यात गेल्याने इजा होते. यामुळे दृष्टी जाण्याची भीती देखील असते. वेळेत उपचार घेतले तर काही प्रमाणात दृष्टी वाचवण्यात यश येते.

लेझर किरणांची तीव्रता अधिक असल्यामुळे नागरिकांनी अशा मिरवणुका टाळणे किंवा या किरणांकडे बघूच नये, ही दक्षता घ्यायला हवी. तसेच शासनाने या धोकादायक लेझर किरणांच्या वापरावर तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### सांगलीतून दुचाकी लंपास

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** डॉ. वसंतदादा सर्वोपचार रुग्णालयातील टी. बी. विभागाच्या दारात उभी केलेली दुचाकी चोरट्याने लंपास केली. याप्रकरणी इरफान अब्दुलरहमान नदाफ (रा. कुपवाड एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोर) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात नोंद केली आहे. फिर्यादी इरफान नदाफ यांची दुचाकी (एमएच १० एक्स ५८२६) २२ रोजी सकाळी आठ वाजता वसंतदादा सर्वोपचार रुग्णालयातून चोरीला गेली.

# मुंबईच्या वेव्हज् परिषदेत नवकल्पनेसोबत तंत्रज्ञानाचा महासागर

## एक ते चार मे या कालावधीत आयोजन

**मुंबई :** केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता वेव्हज् २०२५ परिषद मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. दि. १ ते ४ मे या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. वेव्हज् परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून, रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, निमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचे आयोजन होत असून, या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहेत.

परिषदेच्या पहिल्या दिवशी भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून, काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार (MOU) करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि वेव्हज बझार, वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे. या परिषदेच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी विविध चर्चासत्रांबरोबरच प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# संभाजी पाटील-सावर्डेकर यांचे निधन

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** कुस्तीमध्ये ऑल इंडिया युनिव्हर्सिटी चॅम्पियन तसेच शिक्षण, क्रीडा, कला, सांस्कृतिक, कृषी, सहकार क्षेत्रातील अष्टपैलू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले मराठा समाजाचे विद्यमान अध्यक्ष ॲड. पै. संभाजी गोविंद पाटील-सावर्डेकर (वय ७८) यांचे शनिवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले.

मूळ सावर्डे (ता. तासगाव) येथील सावर्डेकर कुटुंबाची कुस्तीमध्ये देशभर ओळख आहे. भारतभीम ज्योतीरामदादा सावर्डेकर, मल्लसम्राट विष्णूपंत सावर्डेकर यांचा कुस्ती क्षेत्रातील घराण्याचा वारसा संभाजी पाटील-सावर्डेकर यांनी समर्थपणे चालवला. दोन चुलत्यांच्या कडक शिस्तीत संभाजी सावर्डेकर यांनी कुस्तीचे धडे गिरवले. शिवाजी विद्यापीठ, इंटर युनिव्हर्सिटी बोर्ड, इंडिया कुस्ती विभाग, ऑल इंडिया युनिव्हर्सिटी चॅम्पियन, महान भारत केसरी अशा वेगवेगळ्या कुस्ती स्पर्धेत त्यांनी प्रतिनिधीत्व केले. १९७० मध्ये त्यांनी शिवाजी विद्यापीठास ऑल इंडिया चॅम्पियनशीप मिळवून दिली. कुमार भारत केसरी स्पर्धेत आशियाई सुवर्णपदक विजेता कर्तारसिंगशी टक्कर देत लक्ष वेधून घेतले. दिग्गज नेते यशवंतराव चव्हाण व संजय गांधी यांनी त्यांचे कौतुक केले होते. सलग दोनवेळा महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अधिवेशनात महाराष्ट्र चॅम्पियन सन्मानासह मिळवले. कुस्ती क्षेत्रासह वकिलीत आणि मराठी चित्रपटातून अभिनेते म्हणूनही छाप पाडली होती. संभाजी सावर्डेकर यांनी हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी, कर्नाटक केसरीसह अनेक राष्ट्रीय स्तरावर कामगिरी करणारे मल्ल घडवले. भोसले व्यायाम शाळेचा सर्वत्र दबदबा निर्माण केला. वसंतदादा कारखान्याचे उपाध्यक्ष, सहकार बोर्डचे संचालक, वसंतदादा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विश्वस्त म्हणूनही कार्य केले. सावर्डे (ता. तासगाव) गावातही विविध कामांतून ठसा उमटवला. अलिकडेच डिसेंबर २०२४ मध्ये त्यांची मराठा समाज संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. कुस्तीक्षेत्रासाठी त्यांनी वाहून घेतले होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी खासदार संजय पाटील यांचे ते मामा होत.



संभाजी पाटील -सावर्डेकर

### नोएडात कारखान्याच्या बॉयलरचा भीषण स्फोट

**नोएडा :** एका कापड कारखान्याच्या बॉयलरमध्ये शनिवारी भीषण स्फोट झाला. त्यात २० कर्मचारी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलीस अधिकारी अवधेश म्हणाले, सकाळी कंपनीच्या वाफ `च्या बॉयलरमध्ये स्फोट झाला होता. स्फोटात कारखान्याच्या खिडकीच्या काचांना तडा गेला. त्यात २० कर्मचारी जखमी झाले असून त्यांची प्रकृती बरी आहे.

# दुचाकी चोरट्यास अटक

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** विश्रामबाग पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेने दुचाकी चोरटा रामा विठोबा करांडे (वय ४३, रा. विजयनगर, कोर्टाजवळ, सांगली) याला अटक केली. त्याच्याकडून सिव्हिल हॉस्पिटल सांगली व कराड शहरातून चोरलेली दुचाकी जप्त करण्यात आली.

विश्रामबाग ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक रात्री पेट्रोलिंग करत असताना रामा करांडे हा सिव्हिल हॉस्पिटल परिसरात चोरलेली दुचाकी घेऊन फिरताना कुंभार मळा परिसरात आढळला. त्याला संशयावरून ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याने सिव्हिलसमोरून दुचाकी चोरल्याची कबुली दिली. चौकशीत त्याने कराड शहरातूनदेखील दुचाकी चोरल्याचे सांगितले.

विश्रामबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुधीर भालेराव, सहायक निरीक्षक चेतन माने, कर्मचारी संदीप साळुंखे, अमर मोहिते, बिरोबा नरळे, महंमद मुलाणी, प्रशांत माळी, योगेश पाटील, आर्यन देशिंगकर, गणेश बामणे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## जम्मू-काश्मिरमध्ये पर्यटनासाठी गेलेले जिल्ह्यातील १८ नागरिक महाराष्ट्रात पोहोचले

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या अनुषंगाने सांगली जिल्ह्यातील ६६ पर्यटक काश्मीर येथे अडकले होते. यापैकी १८ पर्यटक सुखरूपपणे महाराष्ट्रामध्ये पोहचले आहेत. १४ पर्यटक महाराष्ट्रात पोहचण्याकामी प्रवासामध्ये आहेत व उर्वरित ३४ पर्यटक आज रात्री विमानाव्दारे मुंबईमध्ये पोहचतील, अशी माहिती प्राप्त झाल्याचे जिल्हा प्रशासनातर्फे कळविण्यात आले.

## नेपाळमध्येही पाकिस्तानच्या दुतावासाबाहेर निदर्शने

**काठमांडू :** भारतातील पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध नेपाळची राजधानी काठमांडू येथे शनिवारी करण्यात आला. पाकिस्तानी दूतावासाबाहेर नागरिक आले आणि त्यांनी निदर्शने केली.

नागरिक युवा शक्ती नेपाळच्या वतीने काल मोर्चा काढण्यात आला. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात नेपाळी तरुण सुदीप न्यौपाने (वय २७) याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे नागरिक आणि तरुण संतापले आहेत. तरुणांनी इस्लामिक दहशतवाद ठेचा, दहशतवाद्यांना कठोर शिक्षा द्या आणि हिंदूंची हत्या रोखा, असे फलक हाती धरले होते. दरम्यान, सुदीप न्यौपाने हा पश्चिम नेपाळमधील भुतावल शहराचा रहिवासी होता. लष्कर ए तैयबा दहशतवादी संघटनेशी संबंधित द रेसिस्टन्स फोर्सच्या (टीआरएफ) दहशतवाद्यांनी पहलगाम येथे नुकताच दहशतवादी हल्ला केला होता. त्यात सुदीपची हत्या दहशतवाद्यांनी केली होती. त्यामुळे नेपाळमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



उदगाव : येथे बायपास महामार्गावर अशाप्रकारे वाहन उलटल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

# उदगाव बायपास मार्गावर कंटेनर पलटी; चालक जखमी

केसरी वृत्तसेवा

**जयसिंगपूर :** उदगाव (ता. शिरोळ) येथील सांगली-कोल्हापूर बायपास महामार्गावर असलेल्या टोलनाक्याजवळील वळणावर सिमेंट काँक्रीटचे कच्चे रसायन घेऊन जाणारा मिक्सर कंटेनर पलटी झाल्याची घटना शनिवारी घडली. या घटनेमध्ये चालक जखमी झाला. या अपघातामुळे बायपास महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती.

याच ठिकाणी कंटेनर पलटी होण्याची महिन्यात दुसरी घटना घडल्याने या महामार्गाचे रुंदीकरण करावे, अशी मागणी होत आहे. मिक्सर कंटेनर पलटी झाल्यावर या मार्गावर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती काही काळ वाहतूक कोंडी होऊन वाहतूक विस्कळीत झाली होती. अपघात झालेल्या ठिकाणी डांबरी रोडवर मोठमोठे खड्डे पडले असून, त्या ठिकाणी वळण मार्गावर पडलेले खड्डे पॅचवर्क करून रस्ता रुंदीकरण करावे, अशी मागणी वाहनधारकांकडून होत आहे.

## निधन वार्ता



### जयश्री पाटील

**सांगली :** सांगलीचे माजी महापौर व ए. बी. पाटील इंग्लिश स्कूलचे चेअरमन सुरेश आदगोंडा पाटील यांच्या पत्नी जयश्री पाटील (वय ६३) यांचे काल शनिवारी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या मागे पती सुरेश पाटील, दोन मुले, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन उद्या, सोमवारी सकाळी ९ वाजता अमरधाम स्मशानभूमी, सांगली येथे होणार आहे.



### सुभाष माळी

**कुपवाड :** मालगाव (ता. मिरज) येथील सुभाष भूपाल माळी (वय ७२) यांचे निधन झाले. ते माळी समाजाचे नेते, जिल्हा शिक्षक समितीचे माजी अध्यक्ष, सिद्धेश्वर पतसंस्थेचे माजी चेअरमन, जिल्हा शिक्षक बँकेचे माजी चेअरमन होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, मुलगा, दोन मुली, सून व नातवंडे असा परिवार आहे. माती सावरणेचा विधी सोमवार, दि. २८ रोजी सकाळी ८ वाजता माळी स्मशानभूमी, गुंडेवाडी रोड, मालगाव येथे होणार आहे.



### सुशिला शिरबंदे

**कागवाड :** येथील सुशिला सुभाष शिरबंदे (वय ६१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. माजी सैनिक सुभाष शिरबंदे यांच्या त्या पत्नी होत.



### ईलाही मेवेकरी

**वाळवा :** येथील ज्येष्ठ नागरिक ईलाही अल्लाबक्ष मेवेकरी (वय ७५, रा. पेठभाग) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. जियारत विधी सोमवार, दि. २८ एप्रिल रोजी वाळवा येथे होणार आहे.

# बेकायदा गॅस रिफिलिंग अड्ड्यावर मिरजेत छापा

## एकास अटक : स्थानिक गुन्हे अन्वेषणची कारवाई

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** मिरजेतील खोतनगर, मालगाव रस्ता येथे बेकायदा गॅस रिफिलिंग अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने छापा मारला. यावेळी अभिजित विलास लोहार (वय ३१) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून पाच सिलिंडर, इलेक्ट्रिक मोटार, पाईप असा २२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक संदीप घुगे व अपर अधीक्षक रितू खोखर यांनी गुन्हे अन्वेषणच्या पथकाला बेकायदा गॅस रिफिलिंग अड्ड्यांवर छापे मारण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार गुन्हे अन्वेषणचे एक पथक कारवाईसाठी सज्ज केले होते. सहायक निरीक्षक नितीन सावंत यांच्या पथकातील कर्मचारी अनंत कुडाळकर यांना अभिजित लोहार हा मिरजेतील खोत मळ्यातील घराबाहेर उघड्या पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीरपणे गॅस सिलिंडरचा साठा व गॅस रिफिलिंग करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने लोहार याच्या घरावर छापा मारला. झडती घेतल्यानंतर शेडमध्ये पाच गॅस सिलिंडर, इलेक्ट्रिक मोटार, रेग्युलेटर व रोख १२०० रुपये असा २२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. त्याच्याकडे गॅस सिलिंडर बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे त्याने सांगितले. त्याला मिरज शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

पोलीस कर्मचारी अनंत कुडाळकर यांनी याबाबत फिर्याद दिली. सहायक निरीक्षक सावंत, जयदीप कळेकर, कर्मचारी बसवराज शिरगुप्पी, अमोल ऐदाळे, बाबासाहेब माने, संकेत मगदूम, इम्रान मुल्ला, अतुल माने, रणजित जाधव, सोमनाथ पतंगे यांच्या पथकाने कारवाई केली.



बेकायदा गॅस रिफिलिंग अड्ड्यावर छापा टाकून ताब्यात घेतलेल्या सिलिंडर व संशयितासह पोलीस पथक.


## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात

### संस्थेचे नाव (273507SC024) श्री यशवंत शिक्षण संस्था मांगले, ता. शिराळा, जि. सांगली

या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खालील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यवसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणाली मध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

**विद्यालयाचे नांव :- राजारामबापू पाटील माध्यमिक विद्यालय मांगले ता. शिराळा जि.सांगली**

यू डायस नं. २७३५०७०९५०१ या १००% अनुदानित मराठी माध्यमाच्या विद्यालयात सन २०२४/२०२५ या शैक्षणिक वर्षात खालील रिक्त पदावर शिक्षण सेवक नेमणे आहेत.

| अ. क्र. | इयत्ता | विषय | शैक्षणिक पात्रता | पदे | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६ वी ते ८ वी | मराठी | B.A. / M.A. B.Ed./M.Ed. | १ | १) वि.जा.(अ) -१<br>२) इ.मा.व. -१<br>३) SCBC |
| २ | ९ वी, १० वी | इंग्रजी<br>गणित | B.A. / M.A. B.Ed./M.Ed.<br>B.sc/MSC B.Ed/M.Ed. | १<br>१ | |

**टीप :-** 1) T.E.T. 2) CTET-2 / TAIT परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे व त्याचे प्रमाणपत्र हवे. २) शैक्षणिक कागदपत्रे बोगस निघाल्यास या भरतीतून बाद केले जाईल. ३) इच्छुक व अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारानी जाहिरातीच्या अनुषंगाने पदासाठी पसंती क्रम नमूद करून पोर्टलवर, ऑनलाईन अर्ज करावेत.

संकेत स्थळ : https://tait 2022 mahateacherrecruitment.org.in

संस्था कोड 273507SC024

**सचिव**

**श्री यशवंत शिक्षण संस्था मांगले, ता. शिराळा, जि. सांगली**



# छोट्या जाहिराती

कमी पैशात जास्त फायदा

अधिक तपशीलाकरिता संपर्क : जाहिरात विभाग : २३१०७३७

**पेस्ट कंट्रोल**

● **पॉप्युलर पेस्ट कंट्रोल कंपनी, मिरज** अॅन आय, एस, ओ ९००१ अँड २०१५ कंपनी, २५ वर्षाचा अनुभव, प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग, झुरळ, वाळवी, ढेकूण, मच्छर, उंदीर, घुशी, माशा, मुंगी, पाली, कोष्टी या सर्व प्रकारचे किटक नियंत्रण करून मिळेल. प्री-कंट्रक्शन व पोस्ट कंट्रक्शन इमारत बांधकाम पुर्वीची व बांधकाम नंतरची वाळवी नियंत्रण केले जाईल. इंडस्ट्रीय एक्सपोर्टस फेमिगेशन व इंडस्ट्रीयल पेस्ट कंट्रोल करून मिळेल. मोबाईल नं. ७७७५९६९१११, ९८२३०७१८७३.

**औषधोपचार**

● **आयुर्वेदिक हेल्थ केअर,** स्वच्छ व सुंदर वातावरण. मो. ८७६६८०१५३६.

● **अर्धांग वातावर आयुर्वेदिक** औषध. कोणतेही पथ्य नाही. घरी येऊन पंचकर्म करू. फक्त रविवारी. संपर्क : मो. ८८०५२४२८८६.

● **निद्रानाश, अशक्तपणा,** मुंग्या येणे, रक्तदाब, अस्थमा, मानसिक तणाव, सांधेदुखी, अॅसिडिटी, चक्कर येणे, वजन, स्नायुपेटके इत्यादी कमी करण्यासाठी बिनऔषध सोपा उपाय भेटा : निर्मला : ९६२३०२५१२९/ ०२०२६४३४२५८.

**व्यसनमुक्ती**

● **मानसिक आजार,** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशनरोडमिरज (सांगली). संपर्क - ८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६, ९०२८०८१३३९

**इतर**

● **आमच्याकडे Lathe,** Miling, Shapping, Raidal, Driling Cylindrical surface grinding CNC Retrofit Machines मिळतील. सुधा टेक्नोलॉजी Springfield Housing, Kothrud, Pune. Mob.: 9307717891

● **शेती, नोकरी, व्यवसाय,** बरोबरच पार्टटाईम/फुलटाईम उत्पन्न वाढवण्यासाठी नॅशनल कंपनीबरोबर काम करण्याची संधी. ८६९८९७७१७१.

● **टि.म.वि. तर्फे महिलांसाठी** डेंटल असिस्टंट सर्टि कोर्स. फी रू.१२,०००/- वेळ स.७-१० कालावधी १ महिना, शनिवार पेठ, नोकरीच्या भरपूर संधी संपर्क : ९६६५७३४६९७

● **त्वरा करा ! मर्यादित** प्रवेश! टिमवि, जॉयलँड प्री-स्कूलसाठी प्रवेश सुरू ! प्ले-ग्रुप, नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनिअर केजी आणि पाळणाघर सुद्धा ! संपर्क - ०२०-२४४०३१११/१२, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे-३७.

**भविष्यविषयक**

●**भाग्याचा अचूकवेध** घेण्यासाठी हस्तरेषेवरून अचूक भविष्य! विवाह केव्हा? कोठे? भाग्योदय कोणत्या क्षेत्रात? वेळ ठरवून भेटा. पलास गुरुजी, शनिपार, पुणे. ९८२२७८४३५२.

दक्षिण महाराष्ट्र केसरी

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क साधा.**

**सांगली कार्यालय**
श्री. भूषण म्हैसकर ९४०४२८७५९०

**मिरज कार्यालय**
श्री. मोहन वाटवे ९४२१२१९८९३

**कुपवाड कार्यालय**
श्री. मच्छिंद्र कांबळे ९८९०३४३४३०

**कोल्हापूर कार्यालय**
सौ. अश्विनी टेंबे ७०३८०८५७१३

**सर्व प्रकारच्या जाहिराती खालील ई-मेलवर पाठवाव्यात**
**dmkadvt@gmail.com**

दै. 'दक्षिण महाराष्ट्र केसरी' मध्ये प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदारांनी दिल्याप्रमाणे प्रसिध्द केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत दै. 'दक्षिण महाराष्ट्र केसरी' हमी देऊ शकत नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

# मिरजेतील विकासकामांना पाच कोटींचा निधी मंजूर

## आमदार इद्रिस नायकवडी यांच्या प्रयत्नांना यश

**केसरी वृत्तसेवा**

**मिरज :** महाराष्ट्रप्रदेशराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष व महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार इद्रिस नायकवडी यांच्या विशेष प्रयत्नातून राज्य शासनाच्या नियोजन विभागाच्या मार्फत मिरजेतील प्रलंबित विकास कामे मार्गी लावणे करीता ५ कोटीचा निधी मंजूर झाला आहे.

या कामांबाबत आमदार इद्रिस नायकवडी यांच्याकडे माजी नगरसेवक जमील बागवान व अतहर नायकवडी यांनी पाठपुरावा केला होता. बागवान व नायकवडी यांच्या मागणीला प्रतिसाद देत आमदार इद्रिस नायकवडी यांनी शासन दरबारी निधी उपलब्ध करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. सदरचा निधी शासनाच्या नियोजन विभागामार्फत मिरज शहरातील विविध कामांना प्रदान करण्यात आला असून संबंधीत विकास कामे हे दर्जेदार व गुणवत्तेदार व्हावे यासाठी विशेष लक्ष ठेवणार असल्याबाबत आ. इद्रिस नायकवडी यांनी सांगितले. सदरची कामे सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका या कार्यान्वीत यंत्रणेमार्फत करण्यात येणार असून याबाबत महापालिकेला आदेश प्राप्त झाले आहेत.



इद्रिस नायकवडी

मंजूर झालेल्या कामांमध्ये मिरज मिरासाहेब दर्गा कमान ते जवाहर चौक रस्ता ट्रिमिक्स काँक्रीट व डांबरीकरण करणे. २.५० कोटी, मिरज प्रभाग क्रं-६ मधील अंतर्गत रस्ते ट्रिमिक्स व डांबरीकरण करणे. ५० लाख, मिरज शहरातील मुख्य रस्त्यावर हॉयमास्ट पोल उभे करणे. ५० लाख, मिरज प्रभाग क्र.५ मिरज टाकळी रस्ता गोदड मळा व शाही दरबार हॉल परिसर रस्ते डांबरीकरण करणे. ५० लाख, मिरज बोलवाड रस्ता लक्ष्मीमाता कॉलनी, पप्पु यादव व श्री. मंडले यांच्या घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. ५० लाख आणि मिरज प्रभाग क्र.६ मल्लिकार्जुन देवालय ते शहा घरापर्यंत रस्ता सुधारणा करणे. ५० लाख या विकासकामांचा समावेश आहे.

# काश्मीरमधून २३२ प्रवासी विमानाने मुंबईत दाखल

**मुंबई :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरला गेलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना परत आणण्यासाठी राज्य सरकारने पाठवलेले तिसरे विशेष विमान २३२ प्रवाशांना घेऊन शुक्रवारी मुंबईत दाखल झाले. यातील अकोला, अमरावती येथील प्रवाशांच्या पुढच्या प्रवासासाठी बसेसची व्यवस्था सुद्धा करण्यात आली. आतापर्यंत सुमारे ८०० पर्यटक महाराष्ट्रात परतले आहेत.महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांची यादी प्राप्त केली असून, त्यांना परत पाठविण्याची कार्यवाही युद्धपातळीवर सुरु असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, काल दोन विशेष विमानांनी १८४ प्रवासी महाराष्ट्रात परतल्यानंतर आज तिसरे विशेष विमान २३२ प्रवाशांना घेऊन महाराष्ट्रात पोहोचले.

# प्रवाशांच्या अॅडव्हान्स रकमेसाठी एक खिडकी योजना राबवा

## नागरिक जागृती मंचची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** काश्मिरमधील पहलगाम येथील आतंकवादी हल्ल्यानंतर महाराष्ट्रातील हजारो प्रवाशांचे अॅडव्हान्स बुकिंग पैसे कंपन्याकडे अडकले आहेत. हे पैसे प्रवाशांना परत मिळावेत यासाठी महाराष्ट्र सरकारने एक खिडकी योजना राबवावी, अशी मागणी नागरिक जागृती मंचचे अध्यक्ष सतीश साखळकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाव्दारे केली.

निवेदनात म्हटले आहे की, पहलगामयेथेआतंकवादीहल्ल्यात २८ निरपराध नागरिकांचा जीव गेला. महाराष्ट्रातील जे प्रवासी काश्मिरमध्ये अडकले आहेत, त्यांना आणण्यासाठी शासनाकडून होत असलेले प्रयत्न अभिमानास्पद आहेत. जूनपर्यंत राज्यातील हजारो प्रवाशांनी विमानाचे, रेल्वेचे, खासगी ट्रॅव्हल्सचे अॅडव्हान्स बुकिंग केलेले आहे. तसेच काही ट्रॅव्हल्स एजन्सीकडून काश्मिरमधील हॉटेल्सचे बुकिंग करून त्यांना अॅडव्हान्स रक्कम दिली आहे. मात्र आता सर्व यात्रा रद्द झाल्यामुळे ज्यांनी अॅडव्हान्स बुकिंग केले आहे, त्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होताना दिसत आहे. हे पैसे परत मिळतील की नाही याबाबत नागरिकांच्या मनात अस्वस्थता आहे. याबाबत मदत व पुनर्वसन खात्यामार्फत एक खिडकी योजना राबवून अशा प्रवाशांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.



भिलवडी : प्रशस्तिपत्र स्वीकारताना विजेत्या महिला.

# भिलवडीत सहेली जायंट्सतर्फे भजन स्पर्धा

**केसरी वृत्तसेवा**

**भिलवडी :** येथील जायंट्स ग्रुप ऑफ सहेलीमार्फत महिला भजनस्पर्धेचे आयोजन जानकीबाई चितळे हॉलमध्ये करण्यात आला होते. यामध्ये परिसरातील १० भजनी ग्रुपनी सहभाग घेतला. यातील विजेत्यांना बक्षिसे व प्रशस्तिपत्र देण्यात आली.

भक्ती मकरंद चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व स्पर्धा पार पडल्या. यावेळी ग्रुपचे मूल्यांकन मुग्धा खरे व कीर्तनकार संध्या लेले यांनी केले. भिलवडी जायंट्स ग्रुपचे मार्गदर्शक गिरीश चितळे व मकरंद चितळे यांची यावेळी उपस्थिती होती. सहेली ग्रुपच्या अध्यक्षा सविता चौगुले, स्मिता वाळवेकर, सविता सूर्यवंशी, सीमा शेटे या सहेलींनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले. परिसरातून मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन अश्विनी मगदूम यांनी केले. मे. बी. जी. चितळे यांचे कार्यक्रमासाठी प्रायोजकत्व लाभले. डॉ. सी. व्ही. कुलकर्णी, वाळवेकर मेडिकल, सुबोध वाळवेकर, गजानन माने, चितळे उद्योग समूह कर्मचारी यांनीही सहकार्य केले.



कुपवाड : भारत सूतगिरणीजवळील जागेची पाहणी करताना माजी नगरसेवक विष्णू माने, सहायक आयुक्त सचिन सागावकर.

# कुपवाडमध्ये भाजी मंडई उभारण्यासाठी प्रयत्न करू

## विष्णू माने : भारत सूतगिरणीजवळ जागेची पाहणी

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** कुपवाड येथील भारत सूतगिरणीजवळील महापालिकेच्या दीड एक एकर जागेत प्रशस्त भाजी मंडई उभारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष, माजी नगरसेवक विष्णू माने यांनी दिली. कुपवाडमध्ये भाजी मंडई करण्यासाठीसांगली मिरजकुपवाड महानगरपालिकेने भारत सूतगिरणी चौक येथे दीड एकर जागा संपादन करून घेतली आहे. शासनाकडून कुपवाडसाठी १४ कोटी रुपये मंजूर आहेत. या खर्चातून कुपवाडला अद्ययावत भाजीमंडई उभारण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून प्रयत्न करू, असे माने यांनी सांगितले. काल या जागेची पाहणी माजी नगरसेवक माने, सहायक आयुक्त सचिन सागावकर, सिद्धार्थ ठोकळे यांनी केली.

# समडोळीत जातीच्या दाखल्यांचे वितरण

## धनगर, रामोशी, कुणबी समाजाला लाभ

**केसरी वृत्तसेवा**

**कसबे डिग्रज :** समडोळी येथे जिल्हा प्रशासनाच्या आदेशान्वये शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या शंभर दिवस कृती आराखड्या अंतर्गत मिरज तालुक्यातील समडोळी येथील रामोशी, धनगर, कुणबी समाजातील कुटुंबांना जातीच्या दाखल्याच्या प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

जातीच्या दाखला अभावी संबंधित कुटुंबातील घटकांना कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी अडचण येऊ नये, याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत समडोळी येथे प्रांताधिकारी उत्तम दिघे, अप्पर तहसीलदार अश्विनी वरुटे यांच्या हस्ते जातीच्या दाखल्याचे वितरण करण्यात आले.



समडोळी : येथील रामोशी, धनगर, कुणबी समाजातील कुटुंबांना जातीच्या दाखल्याच्या प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

यावेळी सर्कल वसंत पाटील, सरपंच सुनीता हजारे, ग्रामपंचायत सदस्य देविका पाटील, तलाठी विजया कगुडे, ग्रामविकास अधिकारी आय. आर. जेऊर, उद्योजक राजकुमार पाटील, सचिन ढोले, पोलीस पाटील महेश कोळी, नितीन जाधव, संतोष आंबी यांची उपस्थिती होती.

कृष्णात पाटोळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मार्गदर्शन करताना प्रांताधिकारी उत्तम दिघे यांनी काळाची गरज ओळखून समडोळीतील धनगर, रामोशी, कुणबी समाज बांधवांनी शासनाकडून प्राप्त झालेल्या प्रमाणित व साक्षांकित जातीच्या दाखल्याचे शासकीय, निमशासकीय शैक्षणिक व अन्य महत्वाचे कामासाठी विनियोग करण्याचे आवाहन केले.

यावेळी अप्पर तहसीलदार अश्विनी वरुटे यांनी जिल्हा प्रशासनाने संबंधित समाज घटकासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून गेल्या अनेक वर्षाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत, शासनाने राबवीलेल्या हा उपक्रम स्तुत्य असाच आहे. राजकुमार पाटील यांनी आभार मानले.

# पोखर्णीत एकावर खुरप्याने हल्ला

**केसरी वृत्तसेवा**

**आष्टा :** पोखर्णी (ता. वाळवा) येथे आदल्या दिवशी वडील विकास पाटील यांच्याशी झालेल्या वादाच्या रागातून त्यांचा मुलगा आरोपी विपुल विकास पाटील याने दत्तात्रय बाळकृष्ण पाटील (वय ४२, रा. पोखर्णी) यांच्यावर खुरप्याने हल्ला केला. तर त्याचा भाऊ विराज विकास पाटील व भाचा आकाश पांडुरंग पाटील (रा. पेठ) यांनी जखमी दत्तात्रय पाटील यांना शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी देत काठीने व लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. जखमी दत्तात्रय पाटील यांच्या पत्नी आशा दत्तात्रय पाटील यांनी तिन्ही संशयितांविरुद्ध आष्टा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि.२३ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजणेच्या सुमारास आरोपी विपुल विकास पाटील याने दत्तात्रय बाळकृष्ण पाटील यांच्या ओठावर व हनुवटीवर खुरप्याने मारून जखमी केले. तर त्याचा भाऊ आरोपी विराज व भाचा आरोपी आकाश यांनी त्यांना शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी देत काठीने व लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. अधिक तपास आष्टा पोलीस करीत आहेत.



मिरज : महाराणा प्रताप चौकात पेहेलगाममधील घटनेचा निषेध करून पाकिस्तानच्या झेंड्याला जोडेमारो आंदोलन केले.

# हिंदुत्ववादी संघटनांच्यावतीने काश्मीरमधील घटनेचा निषेध

**केसरी वृत्तसेवा**

**मिरज :** जम्मू काश्मीर मध्ये पेहेलगाम मध्ये दहशतवादी अतिरेक्यांनी निष्पाप पर्यटकांवर बेछूट गोळीबार करून त्यांची हत्या केली. पाकिस्तानच्या पाठिंब्यावरच सदरचे हल्ले होत आहेत हे उघड असून या अतिरेक्यांनी पर्यटकांमध्ये असलेल्या केवळ हिंदूंची वेचून हत्या केली. या भ्याड हल्ल्याचा जगभरातून निषेध होत आहे. मिरजेतील महाराणा प्रताप चौकात हिंदू एकता आंदोलन तसेच अन्य हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध करून पाकिस्तानच्या झेंड्याला जोडे मारून जोरदार निदर्शने केली. या हल्ल्यातील अतिरेक्यांना शोधून त्यांचेवर कठोर कारवाई करावी तसेच अतिरेक्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा, अशी मागणी हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी केली आहे. सदर आंदोलनात विजय शिंदे, सोमनाथ गोटखिंडे, प्रकाश जाधव, जब्बार मुजावर, राजूभाई शेख, रोहित चौगुले, संदीप दिंडे यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.



तासगाव : पहेलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला.

# पहलगाममधील हल्ल्याचा तासगाव येथे निषेध

**केसरी वृत्तसेवा**

**तासगाव :** पहलगाममध्ये पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी २६ भारतीय निष्पाप हिंदू नागरिकांच्या हत्या केल्या. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हिंदू बांधवांना शिवतीर्थ तासगाव या ठिकाणी सकल हिंदू समाजाच्यावतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी 'पाकिस्तान मुर्दाबाद'च्या घोषणा देण्यात आल्या. तसेच दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या पाकिस्तान आणि तत्सम प्रवृत्तींचा निषेध करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टी तासगाव, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आणि सकल हिंदू समाज उपस्थित होता.

# आवास प्लस सर्वेक्षणात शिराळा जिल्ह्यात आघाडीवर

## तालुक्यात आतापर्यंत ४ हजार पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण

**केसरी वृत्तसेवा**

**शिराळा :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आवास प्लस सर्वेक्षणामध्ये शिराळा तालुक्याने संपूर्ण जिल्ह्यात आघाडी घेतली असून, आतापर्यंत ४ हजार पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे व प्रकल्प संचालक नंदिनी घाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

या यशामागे गटविकास अधिकारी प्रकाश यांच्या नेतृत्त्वात घेतलेल्या दोन सखोल प्रशिक्षण कार्यशाळांचा मोलाचा वाटा आहे. या कार्यशाळांमधून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मोबाईल अॅपद्वारे सर्वेक्षण करण्याचे तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. सर्व्हे सुरू झाल्यानंतर उभ्या राहिलेल्या अडचणींचे तात्काळ निराकरण गटविकास अधिकारी तसेच घरकुल कक्षाचे प्रदीप गोडसे आणि मानसिंग पाटील यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या समन्वयाने केले.



नाठवडे गावात आवास प्लस सर्व्हेबाबत ग्रामपंचायत अधिकारी निकिता बारपटे यांना मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी प्रकाश पोळ.

ग्रामपंचायत स्तरावरील अधिकाऱ्यांनी सातत्याने सर्वेक्षणाचे काम प्रामाणिकपणे पार पाडले. तालुक्यातील एकही पात्र कुटुंब योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी सर्वांना प्रेरित करण्यात आले. तालुक्यातील विस्तार अधिकाऱ्यांनीही ग्रामपंचायतींना नियमित भेटी देऊन योग्य मार्गदर्शन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घरे या स्वप्नाच्या दिशेने शिराळा पंचायत समितीने अत्यंत नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने वाटचाल केली आहे. येत्या आठवड्यात आणखी ४ हजार ते ५ हजार कुटुंबांचा सर्व्हे करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, मागील यादीत वगळले गेलेले किंवा समाविष्ट न झालेले अंदाजे ८ हजार ते ९ हजार पात्र लाभार्थींचा सर्व्हे पूर्ण करण्यासाठी विशेष नियोजन सुरू आहे. या उल्लेखनीय यशासाठी शिराळा पंचायत समितीचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामपंचायत स्तरावरील सर्व सहकाऱ्यांचे जिल्हा परिषदेच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# पहलगाम हल्ल्यात मृत पर्यटकांना पलूसमध्ये श्रद्धांजली

**केसरी वृत्तसेवा**

**पलूस :** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या निष्पाप पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पलूस शहरात कॅन्डल मार्च काढण्यात आला. स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने यात सहभाग घेतला. यावेळी नगरपरिषदेचे गटनेते सुहास पुदाले, नगरसेवक विशाल दळवी, व्यापारी संघटनेचे कुमार माळी, भरत इनामदार, मदरसा डॉ.झाकीर हुसेन हायस्कूल मुख्याध्यापक अलीम शेख तसेच पहलगाम येथे गेलेले पर्यटक यांनी मनोगत व्यक्त केले.

हुतात्मा स्मारकपासून मुख्य बाजारपेठेतून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत रॅली काढण्यात आली. सध्या पलूस शहरात श्री धोंडीराज महाराज यात्रा सुरू आहे. यात्रेमधील भाविकांनी सुद्धा श्रद्धांजली वाहिली. रॅली दरम्यान नागरिकांनी ‘शहीद पर्यटक अमर रहे’, ‘आतंकवादाचा निषेध असो’, अशा घोषणा दिल्या. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी देशातील सुरक्षेच्या प्रश्नावर चिंता व्यक्त केली आणि केंद्र सरकारने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी केली. कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक सामाजिक संस्थांच्या वतीने करण्यात आले होते.


## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात मुलाखतीसह टप्पा-२

**शिवाजीराव (बापू) शेडगे शेती औ. शिक्षण विकास मंडळ, कुकटोळी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली. संस्था कोड : (273503SC019)**
**संचलित - मारूतीराव आकाराम कारंडे (सर) माध्यमिक विद्यालय, कुकटोळी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली**

येथ नमूद केलेल्या पदासाठी शैक्षणिक व अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी / मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Marathi | Graduate Teacher Std (6-8) | Consolidated Pay- GT 6-8 (16000) | Aided | Science | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper 2 (Maths-Science) /CTET Paper 2 (Maths-Science) | 1 |
| २ | Marathi | Graduate Teacher Std (9-10) | Consolidated Pay- GT 9-10(18000) | Aided | Language (Hindi) | --- | Graduation | Graduation | --- | 1 |
| ३ | Marathi | Graduate Teacher Std (9-10) | Consolidated Pay- GT 9-10(18000) | Aided | Mathematics | Marathi | Graduation | Graduation | --- | 1 |
| | | | | | | | | Total | | 3 |

**वरील सर्व पदांचे आरक्षण पुढीलप्रमाणे - अनु. जाती - १, ई. डब्लू. एस. - १, एसईबीसी- १, खुला- १**
**टीप :-** वरील रिक्त पदांसाठी पवित्र प्रणालीद्वारे शासनाकडून कळविले जाणार आहे, त्यामुळे संस्थेकडे कोणीही अर्ज करू नये.
**अधिक माहितीसाठी संपर्क :- श्री. विरेंद्रकुमार मारूती कारंडे, अध्यक्ष. मो. नं. : ९०९६३७३७६०, ९२८४३९५५००**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक पाहिजेत

**श्री अंबिका मंडळ कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली (273503SC001) संचलित, श्री बाळासाहेब गुरव (बापू) हायस्कूल व ज्युनि. कॉलेज, कवठेमहांकाळ जि. सांगली** येथे खाली नमूद केलेल्या पदासाठी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

| अ. नं. | विभाग व अनुदान प्रकार | वेतनश्रेणी मानधन | माध्यम | पद | विषय | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | माध्यमिक अनुदानित १००% | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | मराठी | पदवीधर शिक्षक (इ. ६ ते ८) | मराठी | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper 2 (Any Subject) /C TET Paper 2(Any Subject) | १ |
| २ | माध्यमिक अनुदानित १००% | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | मराठी | पदवीधर शिक्षक (इ. ६ ते ८) | हिंदी | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper 2 (Any Subject) /C TET Paper 2(Any Subject) | १ |
| ३ | माध्यमिक अनुदानित १००% | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | मराठी | पदवीधर शिक्षक (इ. ९ ते १०) | गणित | Graduation | Graduation | -- | १ |
| ४ | माध्यमिक अनुदानित १००% | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | मराठी | पदवीधर शिक्षक (इ. ९ ते १०) | विज्ञान | Graduation | Graduation | -- | १ |
| ५ | उच्च माध्यमिक अनुदानित १००% | Consolidated Pay - High Sec (20000) | मराठी | उच्च माध्यमिक शिक्षक | मराठी | Post Graduation | Graduation | -- | १ |
| ६ | उच्च माध्यमिक अनुदानित १००% | Consolidated Pay - High Sec (20000) | मराठी | उच्च माध्यमिक शिक्षक | अर्थ शास्त्र सहकार | Post Graduation | Graduation | -- | १ |
| | | | | | | | Total | | ६ |

**वरील सर्व पदांचे आरक्षण पुढील प्रमाणे : इ.मा.व.- ०१, वि.मा.प्र.- ०१, ई.डब्लू. एस.- ०१, एसईबीसी- ०२, खुला- ०१**
**टीप :-** वरील रिक्त पदांसाठी पवित्र प्रणालीद्वारे शासनाकडून उमेदवारांची नावे कळविली जाणार आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही अर्ज करू नये.
**अधिक माहितीसाठी संपर्क :-** श्री. वैभव बाळासाहेब गुरव, सचिव, श्री अंबिका मंडळ, कवठेमहांकाळ, जि. सांगली. मोबाईल नंबर : ९९७५८९९३००
ईमेल आयडी : vaibhavgurav1@gmail.com

**सचिव,**
**श्री अंबिका मंडळ, कवठेमहांकाळ**

## महात्मा फुले शिक्षण संस्था, उरुण-इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली.

**पवित्र प्रणालीव्दारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा-२) संस्था कोड व संस्थेचे नाव :** ( 273509SC017 ) Mahatma Phule Shikshan Sanstha, Urun-Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli, (Secondary and Higher Secondary) With Interview
**महात्मा फुले शिक्षण संस्था, उरुण-इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली**

या व्यवस्थापनाच्या अनुदानित मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये शासनाने विहित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने शासन मान्येतेच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**मान्य दिनांक : ३१/०३/२०२५** **प्रसिध्दी दिनांक : २५/०४/२०२५**

विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | विषय | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | Marathi | Graduate Teacher Std (6-8) | Consolidated Pay- GT 6-8(16000) | Language (English) | 1 |
| २ | Marathi | Graduate Teacher Std (6-8) | Consolidated Pay- GT 6-8(16000) | Social Science | 1 |
| ३ | Marathi | Graduate Teacher Std (6-8) | Consolidated Pay- GT 6-8(16000) | Science | 2 |
| ४ | Marathi | Graduate Teacher Std (9-10) | Consolidated Pay- GT 9-10(18000) | Language (English) | 2 |
| ५ | Marathi | Graduate Teacher Std (9-10) | Consolidated Pay- GT 9-10(18000) | Mathematics | 1 |
| ६ | Marathi | Higher Secondary Teacher | Consolidated Pay - High Sec (20000) | Chemistry | 2 |
| ७ | Marathi | Higher Secondary Teacher | Consolidated Pay - High Sec (20000) | Biology | 1 |
| | | | | Total | 10 |

**आरक्षण निहाय रिक्त पद तपशील : अनु.जा. -०१, इमाव -०१, ई.डब्लू.एस. -०१, एसईबीसी -०१, खुला -०३**
**तसेच, समांतर आरक्षण निहाय रिक्त पद तपशील : महिला - ०२, माजी सैनिक -०१, (दिव्यांग - अस्थिव्यंग - ०१)**
**सर्वसाधारण सूचना :**

१. अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी - २०२२ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे. असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील व पवित्र पोर्टलवर दिलेल्या अटी व नियम सर्व उमेदवारांसाठी बंधनकारक राहतील. इच्छूक व अर्हता धारण करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदांसाठी पसंतीक्रम नमूद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत.

२. इ. १ ली ते इ. ५ वी व इ.६ वी ते इ. ८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुध्दिमत्ता - २०२२ (TAIT) परीक्षेपूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील. डिसेबंर २०२२ मध्ये CTET करीता प्रविष्ट उमेदवारांचा निकाल मात्र TAIT परीक्षेनंतर लागलेला असला तरी असे उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील. इ. १ ले ते ८वी/इ.९ वी ते १२ वी या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी -२०२२ (TAIT) या चाचणीस प्रविष्ठ असणे आवश्यक आहे.

३. शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सूचना सविस्तर तपशिलासह (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना या शीर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सूचना व सूचनांमध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.

४. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, दि. २६/०२/२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. 3468/2024 तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

५. सदर जाहिरातीमधील सविस्तर सूचना, तपशिल व विहित प्रक्रिया संस्थेच्या www.kbpislmapur.com व पवित्र प्रणाली https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

**सही/-**
**जनरल सेक्रेटरी,**
**महात्मा फुले शिक्षण संस्था,**
**उरुण-इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली.**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा-२)

**श्री सिध्देश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, मळणगाव संचलित - श्रीमती सजाबाई रघुनाथराव शिंदे सरकार हायस्कूल, मळणगाव, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली**

पवित्र पोर्टल मार्फत ऑनलाईन पध्दतीने खालीलप्रमाणे शिक्षक नेमणे आहेत.

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी | विषय | शै. पात्रता | एकूण पद | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | शिक्षणसेवक इ. ५ वी | १६००० | सर्व | H.Sc. DED | ०१ | अनु. जमाती |
| २ | मराठी | शिक्षणसेवक इ. ६ वी ते ८ वी | १६००० | गणित | M.Sc/B.Sc.B.Ed | ०१ | एस.ई. बी.सी. |

अभियोग्यता व बुध्दीमता चाचणी (TAIT) २०२२ प्रविष्ठ झालेल्या उमेदवारापैकी पवित्र प्रणाली (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेत स्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असेच उमेदवार जाहिरातीनुसार अर्ज करू शकतील. सदर भरती प्रक्रीया पवित्र प्रणालीच्या नियमांना अधीन राहून करणेत येईल.

**अध्यक्ष / सचिव**
**श्री सिध्देश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, मळणगाव, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा-२)

**मान्यता दिनांक : १३/०३/२०२५**

**इंद्रभाग्य कृषी व ग्रामीण विकास संस्था, दिघंची संचलित - एकता मोरे-पाटील माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली**

### पाहिजेत

इंद्रभाग्य कृषी व ग्रामीण विकास संस्था, दिघंची (संस्था कोड 273501SC007) या व्यवस्थापनाच्या एकता मोरे-पाटील माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, दिघंची (एकता नगर), ता. आटपाडी, जि. सांगली या उच्च माध्यमिक शाळेत ०२ पूर्णवेळ रिक्त जागावर २०% अंशत: अनुदानित पदावर उच्च माध्यमिक शिक्षक यांच्या नेमणुका करावयाच्या आहेत. गट, विषय, पात्रता व माध्यमनिहाय तपशील पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. रिक्त पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | पद | वेतनश्रेणी | अनुदान प्रकार | विषय | आवश्यक शैक्षणिक पात्रता | पद संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक शिक्षक | S-16: 44900-142400 | अंशत: अनुदानित २०% | रसायनशास्त्र | M.Sc. B.Ed. | 1 | ओ.बी.सी. (OBC) - 1, इ.डब्ल्यू.एस. (EWS)-1 |
| २ | उच्च माध्यमिक शिक्षक | S-16: 44900-142400 | अंशत: अनुदानित २०% | इंग्रजी | M.A. B.Ed. | 1 | |

जाहिरातीचा संपूर्ण तपशील महाराष्ट्र शासनाच्या (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in ) या पवित्र पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. वरील पात्रतेच्या उमेदवारांनी आपली पसंती / प्राधान्यक्रम पवित्र पोर्टलवर विहित कालावधीत नोंदवावा. तसेच पवित्र पोर्टलवरील सुचनेप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही वेळोवेळी करावी.

**सचिव,**
**इंद्रभाग्य कृषी व ग्रामीण विकास संस्था, दिघंची,**
**ता. आटपाडी, जि. सांगली (८६६९११३५४२)**

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा-२)

मान्य दिनांक : २४/०२/२०२५
प्रसिद्धी दिनांक : २५/०४/२०२५

**संस्थेचे नाव** :- ( 273505SC011) sangli shikshan sanstha (Primary) - With Interview

sangli shikshan sanstha या व्यवस्थापनच्या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

**आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| २ | अनु. जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | अनु. जमाती (pesa) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | वि.जा. (अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भ.ज. (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ६ | भ.ज. (क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | भ.ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ८ | इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| ९ | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | ई.डब्लू.एस. | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ११ | एसईबीसी | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| १२ | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | दिव्यांग (४%) | | | | | | | | |
| | | | | | | Intellectual Disability & Multiple Disability (1%) | | | एकूण |
| | अस्थिव्यंग (१%) १ | कर्ण बधीर (१%) ० | | अंध/अल्पदृष्टी (१%) ० | | ID ० | | MD ० | १ |
| | अनाथ (१%) | | | | | | | | |
| | | अनाथ संस्थात्मक ० | | | अनाथ संस्थाबाह्य ० | | | | एकूण ० |
| १३ | एकूण | ४ | ० | ० | ० | ० | ० | ८ | १२ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील** **मान्य दिनांक : २४/०२/२०२५**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी / मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Marathi | Under Graduate Teacher std (1-4/5) | Consolidated Pay- UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1 /CTET Paper 1 | 12 |
| | | | | | | | | | Total | 12 |

**सर्वसाधारण सूचना :-**

१) अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२२ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील. २) इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदांसाठी पसंतीक्रम नमूद करून पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील. ३) इ. १ ली ते इ. ५ वी व इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी -२०२२ (TAIT) परीक्षेपूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करू शकतील. डिसेंबर २०२२ मध्ये CTET करिता प्रविष्ट उमेदवारांचा निकाल मात्र TAIT परीक्षेनंतर लागलेला असला तरी असे उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील. ४) इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ५) इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील विज्ञान/गणित/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ६) इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यांपैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ७) इ. १ ली ते इ ८ वी/इ ९ वी ते इ १२ वी/ अध्यापक विद्यालय या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी- २०२२ (TAIT) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे. ८) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादी साठी सर्वसाधारण सूचना सविस्तर तपशिलासह https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना या शीर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सूचना व सूचनांमध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करून स्वतःची खात्री करूनच ऑनलाईन अर्ज करावेत. ९) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकूण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. १०) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकूण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. ११) व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शवलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. १२) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयामध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १३) जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१/०६/२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. १४) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, दि. २६/०२/२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. ३४६८/२०२४ तसेच त्याअनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**सही/-**
**कार्यवाह,**
**प्राथमिक शाळा समन्वय समिती, सांगली शिक्षण संस्था, सांगली.**



इचलकरंजी : आ. राहुल आवाडे यांनी आयुक्त पल्लवी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक घेतली

# इचलकरंजीतील रस्त्यांच्या तक्रारी होणार नाहीत याची काळजी घ्यावी

## आ. राहूल आवाडे

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** इचलकरंजी शहरात सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या नियंत्रणाखाली विविध रस्त्यांची कामे सुरू आहेत. सदर रस्त्यांच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारच्या तक्रारी होणार नाहीत याची खबरदारी सर्व मक्तेदारांनी घ्यावी तसेच सर्व कामे मुदतीत पूर्ण करण्याच्या सुचना आमदार डॉ. राहुल आवाडे यांनी संबंधित मक्तेदार यांना दिल्या.

आमदार डॉ. राहुल आवाडे यांनी आयुक्त तथा प्रशासक पल्लवी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे, उपायुक्त नंदु परळकर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, संबंधित कामाचे मक्तेदार यांच्यासमवेत बैठकीचे आयोजन केले होते.

बैठकीस महानगरपालिका शहर अभियंता महेंद्र क्षिरसागर, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग आर.व्ही.तोंदले, उप अभियंता एस.एस. पाटील, शाखा अभियंता पी.टी. मोरे, कनिष्ठ अभियंता के.सी. कांबळे, एस.जी. पाटील, एस.पी. शिंदे मक्तेदार महेश भोसले, डी. वाय. भोसले, शिवराज पाटील, बी.ए.कांबळे, राकेश कुकरेजा, सचिन कोळी उपस्थित होते.

## जाहीर समन्स

**मा. सहाय्यक निबंधक, सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., सांगली**
**श्री बसवेश्वर ग्रा. बि. शेती सहकारी पतसंस्था, मर्या., डफळापूर, ता. जत, जि. सांगली.** – अर्जदार

विरूद्ध

| अ. क्र. | दावा क्रमांक | जाबदाराचे नाव | दावा रक्कम | पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १५२८ | श्री. सुनील भिमराव काळे | १,१९,७९८ | रा. जिरग्याळ, ता. जत, जि. सांगली – ४१६४०२ |
| २ | १५२८ | सौ. अश्विनी सुनील काळे | १,१९,७९८ | रा. जिरग्याळ, ता. जत, जि. सांगली – ४१६४०२ |
| ३ | १५४५ | श्री. वृषाल हिम्मत माने | ८१,९८४ | रा. पुकळे प्लॉट, डफळापूर, ता. जत, जि. सांगली |
| ४ | १५२५ | श्री. पांडूरंग रामा चव्हाण | ८०,९४१ | रा. बेळुंखी (कुंभारी रोड), ता. जत, जि. सांगली |
| ५ | १५३९ | श्री. पांडूरंग रामा चव्हाण | ७४,९३३ | रा. बेळुंखी (कुंभारी रोड), ता. जत, जि. सांगली |
| ६ | १५३९ | श्री. सुनील हिंदुराव चव्हाण | ७४,९३३ | रा. बेळुंखी (कुंभारी रोड), ता. जत, जि. सांगली |
| ७ | १५३० | श्री. गुरुपाद सत्याप्पा मगदूम | ६९,६९८ | रा. एकुंडी, ता. जत, जि. सांगली |
| ८ | १५३१ | श्री. गुरुपाद सत्याप्पा मगदूम | ७६,८०१ | रा. एकुंडी, ता. जत, जि. सांगली |
| ९ | १५५२ | श्री. बाबासाहेब कृष्णा ओलेकर | ८०,६४२ | रा. खिलारवाडी, ता. जत, जि. सांगली |
| १० | १५२६ | श्री. सुनील भिमराव काळे | ८०,०३२ | रा. जिरग्याळ, ता. जत, जि. सांगली |
| ११ | १५२६ | सौ. आश्विनी सुनील काळे | ८०,०३२ | रा. जिरग्याळ, ता. जत, जि. सांगली |
| १२ | १५५३ | श्री. रविंद्र गणपती पाटील | ६५,४८९ | रा. शिंगणापूर, ता. जत, जि. सांगली |
| १३ | १५१३ | श्री. शंकर यशवंत कांबळे | ८४,८९३ | रा. शिंगणापूर, ता. जत, जि. सांगली |
| १४ | १५१३ | श्री. प्रकाश भानुदास साठे | ८४,८९३ | रा. साठेनगर, मु.पो. पेड, ता. तासगाव, जि. सांगली |
| १५ | १५११ | श्री. सुनील हिंदुराव चव्हाण | ७९,२७० | रा. बेळुंखी, ता. जत, जि. सांगली |
| १६ | १५११ | श्री. पांडुरंग रामा चव्हाण | ७९,२७० | रा. बेळुंखी, (कुंभारी रोड) ता. जत, जि. सांगली |
| १७ | १५२४ | श्री. रविंद्र गणपती पाटील | ९८,३०७ | रा. शिंगणापूर, ता. जत, जि. सांगली |
| १८ | १५२४ | श्री. सुहास सखाराम शिंदे | ९८,३०७ | रा. डफळापूर, ता. जत, जि. सांगली |
| १९ | १५२० | श्री. मनोजकुमार तानाजी जाधव | १,०१,४३३ | रा. डफळापूर, ता. जत, जि. सांगली |
| २० | १५२७ | सौ. आश्विनी सुनील काळे | ८०,०३२ | रा. जिरग्याळ, ता. जत, जि. सांगली |
| २१ | १५२७ | श्री. सुनील भीमराव काळे | ८०,०३२ | रा. जिरग्याळ, ता. जत, जि. सांगली |
| २२ | १५४८ | श्री. भिमाण्णा बाबुराव कुंभार | ७१,१२८ | रा. बिळुर, ता. जत, जि. सांगली |
| २३ | १५३८ | श्री. पांडुरंग रामा चव्हाण | १,१२,१५० | रा. बेळुंखी, ता. जत, जि. सांगली |
| २४ | १५३८ | श्री. सुनील हिंदुराव चव्हाण | १,१२,१५० | रा. बेळुंखी, ता. जत, जि. सांगली |
| २५ | १५१२ | श्री. पांडुरंग रामा चव्हाण | ६१,६८४ | रा. बेळुंखी, ता. जत, जि. सांगली |
| २६ | १५१२ | श्री. सुनील हिंदुराव चव्हाण | ६१,६८४ | रा. बेळुंखी, ता. जत, जि. सांगली |
| २७ | १५२१ | श्री. मनोजकुमार तानाजी जाधव | १,००,९३७ | रा. डफळापूर, ता. जत, जि. सांगली |

यातील अ. क्र. १ ते २७ जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येत आहे की,

ज्याअर्थी अर्जदार संस्थेने १ ते २७ मधील जाबदार विरूद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये कर्ज वसुली दाखला मिळणेबाबत अर्ज केला आहे आणि ज्याअर्थी जाबदार यांच्या पत्त्यावरती रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठवूनही अपुरा पत्ता/पत्ता सोडून गेले/परगावी या शेऱ्याने परत आलेले आहे. या अर्थी अ. क्र. १ ते २७ मधील जाबदार यांना सदर दाव्यासंबंधी लेखी तोंडी म्हणणे सादर करणेसाठी अंतीम संधी म्हणून दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता या कार्यालयात हजर रहावे.

सदर दिवशी हजर न राहिलेस आपणास काही सांगावयाचे नाही असे समजून तुमचे गैरहजेरीत दाव्याची सुनावणी घेतली जाऊन निर्णय घेतला जाईल, याची नोंद घ्यावी सदर जाहीर समन्स दि. २३/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिला आहे.

सांगली
दि. २३/०४/२०२५

(शिक्का)

सही/–
**उर्मिला राजमाने**
सहाय्यक निबंधक
सांगली जिल्हा नागरी सह. पतसंस्था फेडरेशन, सांगली

**सुनावणीचे ठिकाण :**
सहाय्यक निबंधक,
सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., सांगली
खोली नं. २१० चे उत्तर बाजूस, २ रा मजला, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली मिरज रोड, विजय नगर, सांगली.

# जमीन क्षारपड मुक्तीबाबत धोरणात्मक निर्णय आवश्यक

## डॉ. डी. एस. बुंदेला : ‘दत्त’ने राबवलेला प्रकल्प देशाला मार्गदर्शक

**केसरी वृत्तसेवा**

**जयसिंगपूर :** संपूर्ण देश आणि जगभरात क्षारपड मुक्तीचा प्रश्न वाढत आहे. याबाबत शासन पातळीवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असून, शासनास प्रबंध सादर करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन सेंट्रल सॉईल सेलिनिटी रिसर्च इन्स्टिट्यूट कर्नाल हरियाणाचे शास्त्रज्ञ डॉ. डी. एस. बुंदेला यांनी केले.



शिरोळ येथे जमीन क्षारपड मुक्तीबाबत मार्गदर्शन करताना डॉ. डी. एस. बुंदेला. सोबत इतर मान्यवर.

क्षारपड मुक्तीच्या प्रकल्पासंदर्भातील यश–अपयश, त्यातील अडचणी आणि शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेऊन शासन दरबारी एक निश्चित धोरण बनवण्याच्या दृष्टीने कर्नाल हरियाणाच्यावतीने प्रबंध सादर करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असणारी माहिती आणि शेतकऱ्यांचे अनुभव तसेच शेतीमध्ये असलेल्या अडचणी जाणून घेण्यासाठी कर्नाल येथील शास्त्रज्ञांनी श्री दत्त साखर कारखान्याला तसेच शिरोळ व शेडशाळ येथील क्षारपड क्षेत्रास भेट देऊन शेतकऱ्यांकडून माहिती घेतली. तसेच क्षारपड मुक्तीच्या प्रकल्पाचे कौतुक करून समाधान व्यक्त केले. त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले, श्री दत्त साखर कारखान्याने राबवलेला जमीन क्षारपडमुक्तीचा प्रकल्प हा देशाला मार्गदर्शक ठरत आहे. जमीन क्षारपडमुक्त करण्यामध्ये शेतकऱ्यांची परिस्थिती, नवीन तंत्रज्ञानाचा वापर, प्रकल्पाचा खर्च, बँक कर्ज, विविध योजना, त्यातील त्रुटी, अडचणी, टेंडर प्रक्रिया, प्रकल्पाचे निकष आणि शासन धोरण अशा विविध बाबींचा अभ्यास होणे आवश्यक आहे. जमीन क्षारपड असणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता देशपातळीवर एकच निर्णय झाला तर शेतकऱ्यांची प्रगती होईल.

दत्त कारखान्याचे मार्गदर्शक संचालक गणपतराव पाटील म्हणाले, जमीन क्षारपडमुक्त करण्याची मानसिकता अजूनही शेतकऱ्यांची दिसत नाही. त्याच पद्धतीने शासनाने हा प्रकल्पही मान्य केला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वतःहून या प्रकल्पात पुढाकार घ्यावा. कर्नाल शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाने श्री दत्त कारखान्याला क्षारपडमुक्तीच्या कामात यश मिळाले आहे.

यावेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुरेश कुमार, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सत्येंद्र कुमार, शास्त्रज्ञ डॉ. सागर विभुते, कारखान्याचे चेअरमन रघुनाथ पाटील, व्हाईस चेअरमन शरदचंद्र पाठक, संचालक अमरसिंह यादव, ज्योतीकुमार पाटील, भैय्यासाहेब पाटील, महेंद्र बागे, कारखान्याचे सचिव अशोक शिंदे, मुख्य शेती अधिकारी श्रीशैल हेगाण्णा, ऊस विकास अधिकारी ए. एस. पाटील, ऊस पुरवठा अधिकारी अमर चौगुले, दीपक कळेकर, यांच्यासह शेतकऱ्यांनी आपले अनुभव सांगितले.

# चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** सांगली–इस्लामपूर रोडवरील कसबे डिग्रज येथील राज पेट्रोलपंपासमोर रस्त्याच्या दुभाजकाजवळ उभ्या असणाऱ्या दुचाकीस्वारास चारचाकी चालकाने जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. जखमी बिजय जगन्नाथ इदाते (वय २७ रा. कापूसखेड नाका, इस्लामपूर) यांने चालकाविरुध्द सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. शुक्रवारी दुचाकीवरून विजय इदाते हे राज पेट्रोलपंपाजवळ असणाऱ्या दुभाजकाजवळ उभे होते. त्याचवेळी चारचाकीची वेगाने इदाते यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत इदाते यांच्या डोक्यास जोरदार मार लागला.

## जाहीर समन्स

**मा. सहाय्यक निबंधक, सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., सांगली**
**सिद्धीविनायक नागरी सह. पतसंस्था मर्या; सांगली. गुरुकुल इंग्लिश स्कूल, १०० फुटी रोड, सांगली.** – अर्जदार

विरूद्ध

| अ. क्र. | दावा क्रमांक | जाबदाराचे नाव | दावा रक्कम | पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ५२७ | रोहित राजू मोरे (जामिनदार) | ४५,७१९/– | संजय गांधीनगर झोपडपट्टी मिरज |
| २ | ५३५ | विनोद बाळकृष्ण माळी (जामिनदार) | ३८,२९६/– | १२४, गवळी गल्ली, पेठभाग, सांगली |
| ३ | ५३७ | विनोद बाळकृष्ण माळी (जामिनदार) | ४१,२००/– | १२४, गवळी गल्ली, पेठभाग, सांगली |
| ४ | ५२८ | रोहित राजू मोरे (कर्जदार) | ६४,७४२/– | संजय गांधीनगर झोपडपट्टी मिरज |

यातील अ. क्र. १ ते ४ जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येत आहे की,

ज्याअर्थी अर्जदार संस्थेने १ ते ४ मधील जाबदार विरूद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये कर्ज वसुली दाखला मिळणेबाबत अर्ज केला आहे आणि ज्याअर्थी जाबदार यांच्या पत्त्यावरती रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठवूनही अपुरा पत्ता/पत्ता सोडून गेले/परगावी या शेऱ्याने परत आलेले आहे. या अर्थी अ. क्र. १ ते ४ मधील जाबदार यांना सदर दाव्यासंबंधी लेखी तोंडी म्हणणे सादर करणेसाठी अंतीम संधी म्हणून दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता या कार्यालयात हजर रहावे.

सदर दिवशी हजर न राहिलेस आपणास काही सांगावयाचे नाही असे समजून तुमचे गैरहजेरीत दाव्याची सुनावणी घेतली जाऊन निर्णय घेतला जाईल, याची नोंद घ्यावी सदर जाहीर समन्स दि. २३/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिला आहे.

सांगली
दि. २३/०४/२०२५

(शिक्का)

सही/–
**उर्मिला राजमाने**
सहाय्यक निबंधक
सांगली जिल्हा नागरी सह. पतसंस्था फेडरेशन, सांगली

**सुनावणीचे ठिकाण :**
सहाय्यक निबंधक,
सांगली जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., सांगली
खोली नं. २१० चे उत्तर बाजूस, २ रा मजला, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली मिरज रोड, विजय नगर, सांगली.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर,
१०७९ ख, वसंत प्लाझा, तिसरा मजला, राजाराम रोड, बागल चौक, कोल्हापूर.

## चौकशीची जाहीर नोटीस

**चौकशी अर्ज क्रमांक :– १२/२०२५/सधआ–१**
**न्यासाचे नाव :– न्यु डबोरा फौंडेशन, गांधीनगर, ता. करवीर, कोल्हापूर**
**द्वारा – श्री. रमेश दौलतराव नागदेव, घर नं. १७१, १२, साई मंदिरजवळ, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर**
**श्री. दीपक रमेशलाल नागदेव,** रा. बरॅक नं. १७, रूम नं. १२, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर .... **अर्जदार**

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त–१, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर हे वर नमूद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १८ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत :–

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत : रु. १,०००/– (ब) स्थावर मिळकत : काही नाही
(३) संदर्भित विश्वस्त व्यवस्थेबाबत सर्व बाबी वा बऱ्याचशा बाबी माझ्या अखत्यारीत आहेत काय?
(४) विश्वस्त व्यवस्थेच्या विश्वस्त व व्यवस्थापकाची नावे व पत्ते काय आहेत?
(५) विश्वस्त आणि व्यवस्थापक गेल्यावर विश्वस्त आणि व्यवस्थापक कसे येतात व त्यांची येण्याची रीत काय?
(६) विश्वस्त व्यवस्थेचे उद्देश काय आहेत?
(७) विश्वस्त व्यवस्थेचे सरासरी ठोक वार्षिक उत्पन्न किती?
(८) विश्वस्त व्यवस्था निर्माण करणाऱ्या दस्तऐवजाचा तपशील काय आहे?
(९) विश्वस्त व्यवस्था निर्माण करणाऱ्या दस्ताऐवजा व्यतिरिक्त विश्वस्त व्यवस्थेच्या निर्मितीबाबत काय दस्तऐवज आहे?
(१०) विश्वस्त व्यवस्थेच्या उत्पन्नाची साधने आहेत ?
(११) विश्वस्त व्यवस्थेसंबंधीच्या मालमत्तेवर तपशिल आहे ?
(१२) विश्वस्त व्यवस्थेची योजना आहे काय? असल्यास योजनेचा काय तपशिल आहे?
(१३) विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेच्या मालकी बाबतच्या दस्तऐवजाचा तपशिल काय? आणि ती ज्या अर्जदाराच्या ताब्यात आहे त्यांची नावे आहे काय?
(१४) अर्जात दिलेली माहिती खरी व बरोबर आहे काय?
(१५) सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव काय आहे?

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशारितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त–१, कोल्हापूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी दिली.

**(बा. शि. जाधव)**
**न्याय लिपीक**

(शिक्का)

**(अ. बा. भुईंबर)**
**अधिक्षक (न्याय)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

# शिरोळ पंचायत समितीमध्ये पंचायतराज दिन साजरा

**केसरी वृत्तसेवा**

**जयसिंगपूर :** शिरोळ पंचायत समितीमध्ये पंचायतराज दिन उत्साहात साजरा केला. केंद्र सरकारकडून २४ एप्रिल हा दिवस त्रिस्तरीय पंचायतराज संस्थांमध्ये राष्ट्रीय पंचायत दिवस साजरा करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार या दिनाच्या निमित्ताने पंचायत समितीमार्फत ग्रामपंचायत स्तरावर विशेष ग्रामसभा घेण्यात आल्या.

पंचायत समितीत सहाय्यक गट विकास अधिकारी मुकेश सजमाने यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीमधील पंचायतराज दिन साजरा करण्यात आला. कक्ष अधिकारी प्रशांत डोईफोडे यांनी स्वागत केले. यानंतर सजमाने यांनी पंचायतराज संस्थेचा इतिहास तसेच ७३ वी घटना दुरूस्ती व महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांबाबत माहिती दिली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहार येथून दूरदृश्य प्रणालीव्दारे मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी राज्यामध्ये त्रिस्तरीय राज्यपध्दतीचा अवलंब केला. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी रचना करून ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी सुलभता निर्माण केली असल्याचे सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणामध्ये सर्व सामान्य जनतेला योग्य सुविधा द्या. जनतेच्या हितासाठी कामकाज करा असे आवाहन करीत पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

आभार ग्रामपंचायत विभागाचे अधिकारी राजवर्धन पाटील यांनी मानले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकीयेन यांनी मार्गदर्शन केले.

# भाजपा अल्पसंख्याकच्यावतीने पहलगाम हल्ल्याचा निषेध

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** जम्मू काश्मीर खोऱ्यातील पहेलगाम या ठिकाणी पर्यटकांवर अंधाधुंद गोळीबार करून दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. दहशतवादांच्याकडून झालेल्या भ्याड हल्ल्याचा भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक आघाडीच्या इचलकरंजी जाहीर निषेध करण्यात आला.

भाजपा प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, माजी मंत्री प्रकाश आवाडे, आमदार डॉ. राहुल आवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष अलीहुसेन खान यांच्या नेतृत्वाखालीगांधी पुतळा चौक, इचलकरंजी येथे पहेलगाम हाल्ल्याचा निषेध केला. यावेळी भारतमाता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद, पाकिस्तानचा धिक्कार असो, आशा घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला.

यावेळी अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष आकाशा मुल्ला, जिल्हाध्यक्ष तैयब कुरेशी, औरंग शेख, अनिस म्हालदार, सलीम शिकलगार, बांदार बाबा, इम्रान बागवान, फारुख बागेवाडी, युवा मोर्चा अध्यक्ष जयेश बुगड, शशिकांत मोहिते, अहमद मुजावर, ॲड. भरत जोशी, अमित जावळे, आसिफ काझी, रसूलभाई सय्यद, अमीर मुल्ला, अल्पसंख्याक मोर्चा महिला जिल्हाध्यक्ष रेश्मा शेख, नजमा शेख, निता भोसले, अमिता बिरंजे, माधवी मुंढे, नागुबाई लोंढे, रंजना डावरे, ज्योती लाटणे, उमाकांत दाभोळे, राहुल गागडे हर्षवर्धन गोरे, विजय पवळे, योगिता दाभोळे, महेश निगवे आदी उपस्थित होते.




इचलकरंजी : अल्पसंख्याक आघाडीच्यावतीने जम्मू काश्मीरमधील हल्ल्याचा निषेध करताना भाजप कार्यकर्ते.

## थोडक्यात महत्त्वाचे



इचलकरंजी : काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषदेने काढलेल्या मोर्चात सहभागी नागरिक.

# काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषदेचा मोर्चा

### राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषद इचलकरंजी शाखेने मोर्चा काढला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे प्रांताधिकारी मोसमी चौगुले यांच्याद्वारे निवेदन पाठवले. या निवेदनामध्ये त्यांनी काश्मीरमध्ये तात्काळ राष्ट्रपती राजवट लागू करून जिहादी अतिरेक्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, या हल्ल्यात २६ हिंदू पर्यटकांची धर्म विचारून निर्दयीपणे हत्या करण्यात आली. हा हल्ला देशाच्या सार्वभौमत्वावर तसेच हिंदू समाजावर थेट आक्रमण आहे. काश्मीर खोऱ्यात व्यापक कॉम्बिंग ऑपरेशन राबवून अतिरेक्यांचा बीमोड करावा. सतत हल्ले होणाऱ्या परिसरांमध्ये कायमस्वरूपी लष्करी तळ उभारावेत.यावेळी प्रवीण सामंत, अमित कुंभार, गणेश कांदेकर, सुजित कांबळे, राहुल बोरा यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



इचलकरंजी : प्रांताधिकारी यांना निवेदन देताना कैश बागवान, अहमद मुजावर, राजू बोरगावे व इतर.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा मुस्लिम समाजाकडून निषेध

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ समस्त मुस्लिम समाज इचलकरंजीकडून निषेध मोर्चा काढण्यात आला. चांद तारा मस्जिद येथून प्रांत कार्यालयापर्यंत मोर्चा काढून निदर्शने करण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी मोसमी चौगुले यांना निवेदन देण्यात आले.या भ्याड आतंकवादी हल्ल्याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांना विनंती करतो की, या भ्याड हल्ल्याचे जे जबाबदार असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व जशास तसे उत्तर द्यावे; असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी मुस्लिम समाज कोअर कमिटीमार्फत कैश बागवान, अहमद मुजावर, जाफर मुजावर, अबू पाणारी, राजू बोरगावे, समीर शेख, सादिक जमादार, युसूफ तासगावे, जाहीर सौदागर, मौलाना जावेद, हाफिज मुसा, पापालाल मुजावर, फिरोज बागवान, फिरोज शिकलगार, मसूद गडकरी उपस्थित होते.



इचलकरंजी : प्रांताधिकारी मोसमी चौगुले यांना निवेदन देताना पत्रकार.

# इचलकरंजीत पत्रकारांच्यावतीने पहलगाममधील हल्ल्याचा निषेध

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** इचलकरंजी शहरातील पत्रकारांच्यावतीने पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्याचा निषेध करून बळी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रांतधिकारी मोसमी चौगुले यांना निवेदन देऊन कठोर कारवाईची मागणी केली. तसेच इचलकरंजीतील बांगलादेशी शोध मोहीम व पाकिस्तानी प्रवासी शोध मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी केली. इचलकरंजी पत्रकार कक्ष येथे झालेल्या निषेध सभेत अध्यक्ष अतुल आंबी यांनी अतिरेकी हल्ल्याचा निषेध आणि श्रद्धांजलीचा ठराव मांडला. प्रास्ताविक इराण्णा सिंहासने यांनी केले. यावेळी रामचंद्र ठिकणे, धर्मराज जाधव, अभिजित पटवा यांनी मनोगत व्यक्त केले. प्रांताधिकारी मोसमी चौगुले यांना निवेदन देण्यात आले. कार्यक्रमास इचलकरंजी प्रेस क्लबचे अध्यक्ष मयूर चिंदे, तसेच संजय कुडाळकर, संजय खूळ, ऋषिकेश राऊत, अरुण वडेकर, सुनिल मनोळे, महेश आंबेकर, संदीप जगताप, अमर चिंदे, शरद सुखटणकर, संभाजी गुरव, सुभाष भस्मे, अनिल दंडगे, बसवराज कोटगी, संदीप बिडकर, बाबासाहेब राजमाने, डॉ . पांडुरंग पिळणकर, अजय काकडे, अरुण काशीद, विजय चव्हाण उपस्थित होते.

## सुप्रभात

### पंचांग...

रविवार, २७ एप्रिल २०२५, चैत्र कृ. ३०, शके १९४७
नक्षत्र : अश्विनी, सूर्योदय ६.१५ मि., सूर्यास्त १८.५८ मि.

### आजचा दिवस...

दर्श अमावास्या, अमावास्या वर्ज्य.

### भविष्य...

**मेष** : कर्ज मिळण्यात अडचणी येतील.
**वृषभ** : पवित्र ठिकाणी तीर्थयात्रा होतील.
**मिथुन** : सरकारी कामे होतील.
**कर्क** : पुष्कळ धनवान मित्र भेटतील.
**सिंह** : टीकात्मक लेखन करू नये.
**कन्या** : नेतृत्व करण्याची हौस राहील.
**तूळ** : द्रव्यार्जनासाठी उलाढाली कराल.
**वृश्चिक** : कुटुंबासमवेत प्रवास घडेल.
**धनु** : घराची दुरुस्ती करावी लागेल.
**मकर** : खेळाडूंना प्राविण्य-प्रसिद्धी मिळेल.
**कुंभ** : कौटुंबिक सुख लाभेल.
**मीन** : कोर्टाचे कामात तडजोड स्वीकारावी लागेल.

### दिन विशेष...

१५२१ : फिलीफाईन्सचा शोध लावणाऱ्या पोर्तुगीज फर्निनांड मॅगेलनची हत्या.
१७९१ : चुंबकीय दूरसंदेश वाहकाचे संशोधक सॅम्युअल फिनले ब्रिज मॉर्स यांचा जन्म.
१८५३ : मुंबई-पुणे पहिली रेल्वे सुरू.
१८५४ : पुण्याहून मुंबईला तारायंत्राद्वारे पहिला संदेश पाठविला.
१८७८ : स्त्रियांना विद्यापीठाचे उच्च शिक्षण घेण्याला कोलकत्ता विद्यापीठाने मंजुरी दिली.
१८८३ : नाटककार मामा वरेरकर यांचा जन्म.
१८९८ : भारतीय गणिती आणि ज्योतिष शास्त्रज्ञ शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचे पुणे येथे निधन.
१९३० : वृत्तपत्रांचे अधिक खांचे नियंत्रण करता यावे म्हणून 'दि इंडियन प्रेस ऑर्डिनन्स १९३०' हा वटहुकूम जाहीर केला.
१९६२ : जिल्हा लोकल बोर्डाचा ९६ वर्षांचा कारभार संपून महाराष्ट्रात जिल्हा परिषदा सुरू झाल्या.
१९७६ : मराठी कवी चिंतामणी त्र्यंबक खानोलकर (आरती प्रभू) यांचे निधन.
१९८० : सहकारअग्रणी पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील यांचे निधन.
१९९२ : महाराष्ट्र शासनाचे जनसंपर्क अधिकारी विश्वनाथ वामन उर्फ वि. वा. पत्की यांचे निधन.
१९९८ : भारताचे माजी क्रिकेटपटू रमाकांत देसाई यांचे निधन.
१९९९ : एकाच अग्निबाणाद्वारे एकापेक्षा अधिक उपग्रह प्रक्षेपित करण्याची क्षमता भारताला प्राप्त.
२००३ : 'लक्ष्य' या वैमानिकरहित विमानाची ओरिसातील चंडीपूर येथे यशस्वी चाचणी.

### सुभाषित...

**अलब्धं चैव लिप्सेत लब्धं रक्षेदवेक्षया ।**
**रक्षितं वर्धयेत् सम्यग् वृद्धं तीर्थेषु निक्षिपेत् ।।**

जे मिळाले नाही ते मिळविण्याची इच्छा करावी, मिळाल्यावर त्याचे काळजीपूर्वक रक्षण करावे; रखलेले ते चांगले वाढवावे आणि वाढल्यानंतर ते पवित्रक्षेत्र वा मनुष्य- यांच्या ठिकाणी खर्च करावे.

## हातकणंगले : २ हजार संजय गांधी निराधारांना मंजूर पत्राचे वाटप

**केसरी वृत्तसेवा**
**पेठ वडगांव :** हातकणंगले तालुका संजय गांधी निराधार योजनेतील पात्र दोन हजार लाभार्थ्यांना मंजूर आदेश पत्राचे वाटप कार्यक्रम खासदार धैर्यशीलदादा माने यांच्याहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये तहसीलदार कार्यालय हातकणंगले येथे झाला. यावेळी समितीचे अध्यक्ष झाकीरहुसेन भालदार यांनी स्वागत केले. यावळी तहसीलदार सुशील बेल्हेकर, माजी जि.प.सदस्य अरुण पाटील, राष्ट्रवादी पक्ष तालुकाध्यक्ष संभाजी पवार, यासीन मुजावर, रमेश घोरपडे, शकील जमादार यांच्यासह समितीचे सदस्य संजय देसाई, दौलत पाटील, संदेश भोसले, अमोल गावडे, कविता सूर्यवंशी, सुदाम इंगवले उपस्थित होते. आभार नायब तहसीलदार संदीप चव्हाण यांनी मानले.

## बाजारभाव - सांगली

(सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती) (१० किलोचे)

| | | | |
|---|---|---|---|
| गूळ भेली | ३३५-४२५ | ज्वारी हायब्रीड | ३३१-३५० |
| हळद राजापुरी | १३७०-२५३० | ज्वारी शाळू | ३४२-४२० |
| मिरची देशी | १२५०-१६५० | बाजरी | २८०-३५० |
| खपली | ५३०-४८० | गहू | ३४०-४४० |
| सोयाबीन | -- | मका | २४०-२५० |
| तूर | ७७०-८५० | भात | -- |
| हरभरा | ५७०-६१० | तांदूळ | -- |
| धने | ७००-८०० | वाटाणा | १६००-१७०० |
| करडी | ५८०-६१० | मसूर | ६९८-७५० |
| मूग | ८७०-९३० | हुलगा | ६५०-७०० |
| मटकी | ७५०-८५० | सूर्यफूल बी | -- |
| उडीद | ७४०-७६० | बेदाणा | -- |
| एरंडी | -- | हळद परपेठ | ९००-११५० |

# आश्रमशाळेच्या बिरजू चौधरीची सहाय्यक जिल्हाधिकारीपदी नियुक्ती

**केसरी वृत्तसेवा**
**दिनेश हसबनीस /शिराळा**


बिरजू चौधरी

परिस्थितीची जाणीव, शिकण्याची तीव्र इच्छा, काहीतरी करून दाखवण्याची उमेद, आई-वडिलांची मेहनत, शाळेचा मदतीचा हात, शिक्षकांचं मार्गदर्शन यामुळे बिरजू घडत गेला, प्रगतीचं शिखर चढत गेला. आणि आयएएस होऊन सहाय्यक जिल्हाधिकारीपदी नुकताच रुजू झाला. ही प्रेरणादायी कहाणी आहे पोटाची खळगी भरण्यासाठी राजस्थानमधून सांगलीच्या शिराळ्यात आलेल्या आणि आश्रमशाळेत शिकून आपल्या गुणवत्तेचा ठसा समाजात उमटवलेल्या बिरजू गोपाल चौधरी या अवघ्या चोवीस वर्षाच्या युवकाची.

> आमच्या सद्गुरु जंगली महाराज शिक्षण संस्थेच्या शिराळा शाखेत बिरजूचं शिक्षण झालं याचा मला सार्थ अभिमान आहे. प्रशांत नलवडे (आय.ए.एस), रोहन जाधव (लेफ्टनंट), डॉ. गीतांजली जाधव (एम.बी.बी.एस. दुबई), कबड्डी खेळात महाराष्ट्राचं नेतृत्व केलेली आणि खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमात नाव घेऊन कौतुक केलेली सोनाली हेळवी असे एक ना अनेक विद्यार्थी आमच्या संस्थेच्या विविध शाखांमधून घडत आहेत.विद्यार्थ्यांची शिकण्याची इच्छा आणि शिक्षकांची मेहनत यामुळे हे सुवर्णक्षण निर्माण होत आहे.
> – **एकनाथराव जाधव**, संस्थापक सचिव

शिराळा येथील सद्गुरु आश्रमशाळेचा बिरजू गोपाल चौधरी हा माजी विद्यार्थी आहे. राजस्थानात पाली जिल्ह्याचा सहायक जिल्हाधिकारीपदी त्याची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. सन २०२३ – २४ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून देशात १८७ व्या रँकने बिरजू उत्तीर्ण झाला होता. राजस्थान सरकारने १३ आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या नुकत्याच नियुक्त्या केल्या. यात पाली जिल्हाच्या सहायक जिल्हाधिकारीपदी बिरजू चौधरी यांची वर्णी लागली आहे.

वीस वर्षांपूर्वी बिरजू आणि त्याचे कुटुंब पोटाची खळगी भरण्यासाठी राजस्थानमधील कोटा येथून सांगलीच्या शिराळ्यात आले होते. दहा बाय दहाच्या भाड्याच्या खोलीत राहून त्यांनी संसार केला. पहिली ते दहावी बिरजू येथील सद्गुरु आश्रमशाळेत शिकला. वडील फरशी बसवण्याचे काम करायचे. मिळणाऱ्या तुटपुंजा मजुरीतून त्यांच्या हातातोंडाचा मेळ व्हायचा. परिस्थितीची जाणीव असल्यामुळे बिरजू मनापासून अभ्यास करायचा. शाळेतील शिक्षकही त्याला सर्वतोपरी मदत करायचे.

राजस्थानातून आल्यामुळे सुरुवातीला त्याला मराठी बोलता येत नव्हते आणि समजतही नव्हते. मात्र शिक्षकांच्या आणि मित्रांच्या मदतीने त्याने मराठीवर प्रभुत्व मिळवले. दहावी ९३ टक्के गुणांनी उत्तीर्ण झाला.

घरच्या घरगुती अडचणीमुळे बिरजूच्या कुटुंबाला पुन्हा राजस्थानात स्थलांतर करावे लागले. पुढील महाविद्यालयीन शिक्षण त्याने तिथेच घेतले. आश्रमशाळेत त्याचा शिक्षणाचा पाया मजबूत झाला होता. त्याची जिद्द, चिकाटी आणि गुणवत्ता पाहून शिक्षकांनीही त्याच्यात आत्मविश्वास निर्माण केला. त्याच्या जोरावर त्याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले.

## सांगली जिल्हा माथाडी सदस्य नेमणुकीसाठी अर्जाची मुदत १० मे

**केसरी वृत्तसेवा**
**सांगली :** माथाडी अधिनियमाच्या कलम ६ अन्वये सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सांगली या मंडळाकरिता मंडळ गठीत करावयाचे आहे. या मंडळावर मंडळ सदस्य म्हणून कामगार-मालक प्रतिनिधी यांची नेमणूक करण्याकरिता इच्छुक पात्र व्यक्तींनी दि. १० मे २०२५ पूर्वी अर्ज सादर करावेत, असे सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सांगलीचे अध्यक्ष यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

शासनाच्या दि. २२ एप्रिल २०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मंडळ सदस्य म्हणून काम करण्याकरिता इच्छुक असलेले तसेच मंडळाचे अनुसुचित उद्योगातील नोंदित व कार्यरत कामगार/कामगार संघटना व मालक यांनी त्यांचे अर्ज/नामनिर्देशन, त्यांचे संपूर्ण नाव, वय, पत्ता व चारित्र्य पडताळणी दाखला तसेच माथाडी क्षेत्रातील कार्य, अनुभव इत्यादी दि. १० मे पर्यंत मंडळास प्लॉट नं. ९४ ए, सांगली चेंबर ऑफ कॉमर्सच्या समोर, पद्मभूषण वसंतदादा पाटील मार्केट यार्ड, सांगली- ४१६४१६ या पत्त्यावर/ sanglimathadigmail.com या ई-मेलवर सादर करावेत. प्राप्त अर्ज व शिफारशींमधून योग्य त्या व्यक्तींची निवड करून मंडळ सदस्यपदी नेमणूक करण्याचा अधिकार शासनाकडे राहील, असे पत्रकात म्हटले आहे.

## रिशी भगतची खेलो इंडिया युथ गेम्ससाठी निवड

**केसरी वृत्तसेवा**
**कुपवाड :** नव कृष्णा व्हॅली स्कूलचा विद्यार्थी रिशी भगत याची खेलो इंडिया युथ गेम्स २०२५ साठी निवड झाली आहे.


रिशी भगत

रिशीने शासकीय शालेय राष्ट्रीय स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले तसेच सीनियर राष्ट्रीय स्पर्धांमध्येही कांस्यपदक प्राप्त केले आहे. कमी वयात त्याने या स्पर्धेमध्ये यश मिळवले आहे.

रिशी दररोज सकाळी व सायंकाळी प्रत्येकी तीन तास असा सातत्याने सराव करतो. त्याच्या या मेहनतीमुळेच आज तो महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. खेलो इंडिया युथ गेम्स २०२५ या स्पर्धा ५ मेपासून बिहारमधील गया येथे होणार आहेत. रिशी २०० मीटर, ४०० मीटर व १५०० मीटर फ्री स्टाईल या तीन प्रकारांमध्ये आपले कौशल्य सादर करणार आहे.

रिशीच्या या यशामध्ये अध्यक्ष प्रवीण लुंकड, सचिव एन. जी. कामत, प्राचार्या व डायरेक्टर संगीता पागनीस, उपप्राचार्य प्रशांत चव्हाण, सुशांत सूर्यवंशी, सुरज स्पोर्ट्स अकॅडमीचे विनायक जोशी यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले आहे.


शिराळा : मयूर पाटील यांचा सत्कार करताना विराज नाईक.

## महसूल सहायक निवडीबद्दल मयूर पाटील यांचा सत्कार

**केसरी वृत्तसेवा**
**शिराळा :** सागाव (ता. शिराळा) येथील मयूर अनंत पाटील यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून कोकण विभागातील शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण विभागात महसूल सहायक म्हणून निवड झाली आहे. त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल विराज उद्योग समूहाचे अध्यक्ष विराज नाईक यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी 'विश्वास'चे संचालक बाबासो पाटील, दत्तात्रय तानवडे, अभिजीत पाटील, महादेव पाटील, अनंत पाटील, अनिल फातले, कृष्णात पाटील, सिद्धेश पाटील आदी उपस्थित होते.

## महावितरण संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी पदभार स्वीकारला

**मुंबई :** महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) म्हणून राजेंद्र पवार यांनी शुक्रवारी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

नवनियुक्त संचालक राजेंद्र पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून विशेष प्राविण्यासह प्राप्त केली. त्यानंतर १९८९ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता. पेण) येथे रुजू झाले.


राजेंद्र पवार

त्यानंतर पदोन्नतीवर त्यांनी सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंतापदी काम केले आहे. सन २०११ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंतापदी निवड झाली. या काळात त्यांनी पेण, कळवण, नाशिक, पनवेल, कल्याण येथे काम केले आहे. तसेच अधीक्षक अभियंता म्हणून नागपूर व पुणे येथे काम केले आहे. गेल्या दोन वर्षांपासून पवार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

राजेंद्र पवार यांनी याआधीच्या सेवेत लोकाभिमुख प्रशासन, ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे परिमंडलामध्ये मुख्य अभियंता म्हणून त्यांनी महसूलवाढ, नवीन वीजजोडण्या, छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. त्यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण व विविध उपक्रमांमुळे पुणे लघु प्रशिक्षण केंद्राला सलग तीन वर्ष राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे.

## मेधा पाटकर यांना अटक, सुटका

**नवी दिल्ली :** दिल्लीचे तत्कालिन नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांच्या बदनामी केल्याच्या खटल्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना शुक्रवारी दिल्ली उच्च न्यायालयाने दिलासा दिला. त्यांना सत्र न्यायालयाने शिक्षा ठोठावली होती. त्याची शिक्षा न्यायालयाने काल रद्द केली.

# पर्यावरण संवर्धन परिषद आंतरराष्ट्रीय सहकार्याचा मेळावा

### डॉ. सौरव दीक्षित

**केसरी वृत्तसेवा**
**जयसिंगपूर :** शरद इन्स्टिट्यूटमध्ये होत असलेली परिषद म्हणजे बुद्धिमत्ता, नवोपक्रम आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचा मेळावा आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरणीय शाश्वतता, ऊर्जा लवचिकता आणि पृथ्वी प्रणाली विज्ञानाच्या समन्वयावर काम करणाऱ्या तज्ज्ञाना एकत्र आणते, असे प्रतिपादन चितकारा विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. सौरव दीक्षित यांनी केले.

ते यड्राव येथील शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील ग्रीनएआय नेक्सस २०२५ या आंतरराष्ट्रीय परिषदेत (कॉन्फरन्स) अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे हे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. दीक्षित म्हणाले, या परिषदेसाठी जगभरातून दोनशे शोधनिबंध मिळाले होते. त्यातून उच्च गुणवत्तेचे ७३ शोधनिबंध निवडले आहेत. त्यामध्ये अक्षय ऊर्जा, पर्यावरणीय देखरेख, शाश्वत शेती, स्मार्ट शहरे आणि लवचिक पायाभूत सुविधांमध्ये एआय यासारख्या विषयांचा समृद्ध संग्रह समाविष्ट आहे.


यड्राव : ग्रीनएआय नेक्सस २०२५ या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. सौरव दीक्षित, अनिल बागणे, किरिल एपिफँटसेव्ह, रजत गेरा, कौशल कुमार आदी मान्यवर.

यावेळी श्री. बागणे म्हणाले, उद्योगामधील आवश्यक तंत्रज्ञान याचे संशोधन अभियांत्रिकी शिक्षण संस्थेमध्ये होणे आवश्यक आहे. आणि हे सर्व तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्ये ह्या परिषदेमधून जगासमोर येतात. त्यामुळे अशा परिषदा महत्त्वाच्या आहेत.

यावेळी रशिया येथील युनिव्हर्सिटी ऑफ एरोस्पेस अँड इन्स्ट्रुमेंटेशनचे डॉ. किरिल एपिफँटसेव्ह म्हणाले, बदलत्या पार्श्वभूमीवर शरद इन्स्टिट्युट असे नवोपक्रम, आंतरविद्याशाखीय संशोधन आणि सामाजिक प्रभावासाठी परिषद घेत आहे. त्यामुळे तंत्रज्ञान विकसित होण्यासाठी शरद ही एक पोषक संस्था आहे. म्हणून रशियातील विद्यापीठ महाविद्यालयाशी सामंजस्याचा करार करीत आहोत. पर्यावरणीय प्रश्नासाठी कचऱ्याच्या पुनर्वापराचे संशोधन खूप महत्वाचे आहे. प्रदूषणमुक्त भविष्य साध्य करण्यासाठी एआय व समस्या कमी करण्यास मदत करू शकते.

सीएमआर विद्यापीठाचे डॉ. रजत गेरा म्हणाले, आर्टिफिशियल इंटेलिजेंस हवामानाच्या पद्धतींचा अंदाज घेऊन आणि अक्षय ऊर्जेच्या वापराचे अनुकूलन करून पर्यावरण संरक्षण क्रांती घडवत आहे. हे परिसंस्थांचे निरीक्षण करण्यास, उत्सर्जन कमी करण्यास आणि नैसर्गिक संसाधनांचे अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापन करण्यास मदत करते. एआयच्या मदतीने, आपण आपल्या पृथ्वीसाठी एक स्मार्ट, पर्यावरणपूरक आणि अधिक शाश्वत भविष्य घडवू शकतो.

के. आर. मंगलम विद्यापीठाचे प्रा. डॉ. कौशल कुमार म्हणाले, मूल्यवर्धित संशोधन, शाश्वत पद्धती इत्यादींच्या बाबतीत जीवन सोपे बनवणे हे एआय तंत्रज्ञानाने होईल. समाजातील गंभीर व मोठ्या समस्या सोडविण्यासाठी तसेच तरुणांसाठी तांत्रिक सल्लागारांना मदत करते.

सूत्रसंचालन प्रा. अपुर्वा बापट व प्रा. कल्याणी बेडेकर यांनी केले. आभार प्राचार्य डॉ. एस. ए. खोत यांनी मानले. यावेळी परिषदेचे संयोजक डॉ. गोविंदसिंग पटेल व डॉ. सुकांत देबनाथ यांच्यासह सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, डीन, प्राध्यापक, उपस्थित होते.

# जिल्हा पारदर्शक भूसंपादन सुसंवाद शिबिर सुरू

**केसरी वृत्तसेवा**
**मिरज :** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे कडील १०० दिवस गतिमान प्रशासन अभियाना अंतर्गत उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक १ व तहसीलदार मिरज यांच्या संयुक्त विद्यमाने सांगली जिल्हा पारदर्शक भूसंपादन सुसंवाद शिबिराचे शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी तहसील कार्यालय मिरज येथे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्याहस्ते उद्घाटन करून शुभारंभ करण्यात आला.



सांगली : जिल्हा पारदर्शक भूसंपादन शिबिरात बोलताना जिल्हाधिकारी अशोक काकडे. सोबत इतर मान्यवर.

अजय पवार भूसंपादन अधिकारी क्र. १ तथा प्र.निवासी उपजिल्हाधिकारी मिरज यांनी सदर कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. सन २०१५ पासून म्हैसाळ प्रकल्प कॅनॉलमध्ये भूसंपादित केलेल्या जमिनीचा मोबदला रक्कम अद्याप न घेतलेल्या बेळंकी येथील ८१ खातेदार तसेच सांबरवाडी येथील ५८ खातेदार यांना नोटीसा देऊन भूसंपादन सुसंवाद शिबिरात बोलावण्यात आले होते. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी सन २०१५ पासून भूसंपादित जमिनीची मोबदला रक्कम संबंधित खातेदार यांनी न स्वीकारण्याचे कारण, त्यावर सदर रक्कम कायदेशीर बाबींची पूर्तता करून संबंधित खातेदार यांना कशा देता येईल याबाबत मार्गदर्शन केले. सन २०१५ पासून रक्कम न स्वीकारल्याने खातेदारांचे झालेले आर्थिक नुकसान याबाबत चर्चा करून उदाहरण दाखल खातेदारांना पटवून दिले. त्याचप्रमाणे सुसंवाद शिबिरामार्फत खातेदारांनी भूसंपादनाची मोबदला रक्कम स्वीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास जिल्हा न्यायालय सांगली येथील जिल्हा सरकारी अभियंता श्री. भोकरे उपस्थित होते त्यांनी या शिबिराबाबत कायदेशीर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मिरज तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. खोत आणि स्नेहल कणीचे भूसंपादन अधिकारी, सविता लष्करे भूसंपादन अधिकारी, उत्तम दिघे, उपविभागीय अधिकारी मिरज, लीड बँक मॅनेजर तसेच संबंधित गावचे मंडळ अधिकारी, ग्राम महसुल अधिकारी, संबंधित खातेदार उपस्थित होते.

शुभारंभाच्या दिवशी बेळंकी येथील तीन प्रकरणी तसेच सांबरवाडी येथील दोन प्रकरणात संबंधित खातेदार यांनी आवश्यक स्वयंघोषणापत्र देऊन भूसंपादनाची मोबदला रक्कम स्वीकारत असल्याचे सांगितले. आभार तहसीलदार मिरज डॉ. अपर्णा मोरे-धुमाळ यांनी केले.

दक्षिण महाराष्ट्र केसरी



## जगदाळे, गनबोटे कुटुंब अद्याप धक्क्यातच

(पान १ वरून)

ऐकणाऱ्यांचे मन पिवळवटून जात आहे. तर, दोन्ही कुंटुंबात स्मशान शांतता पाहण्यास मिळत आहे.

**डोळ्यादेखत पतीची हत्या**

दहशतवाद्यांनी सर्व पुरूषांना अजान म्हणायला लावले. त्यानंतर त्याने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात मला माझा पती गमवावा लागला. माझ्या डोळ्यादेखत दहशतवाद्यांनी पतीला ठार मारले, असे कौस्तुभ गनबोटे यांच्या पत्नीने मुख्यमंत्री फडणवीस यांना सांगितले.

**वडील कोसळताच मी ही कोसळले...**

आम्ही फोटो काढत असताना अचानक गोळीबार सुरू झाला. सर्वत्र एकच गोंधळ उडाला, आम्ही टेंटमध्ये लपलो. गनबोटे काका खाली झोपले होते. एकजण आमच्याकडे आला. त्याने पुरूषांना गोळ्या मारायला सुरुवात केली. माझ्या वडिलांना ३ गोळ्या लागल्या. माझे वडील जागेवर पडले, काकांना देखील दोन गोळ्या लागल्या. वडिलांना गोळ्या लागल्याने ते कोसळले. त्यांना पाहून मी ही चक्कर येऊन कोसळले. स्थानिकांनी भरपूर मदत केली. त्यानंतर लष्कराचे जवान पोहचले. जखमींना श्रीनगरला नेण्यात आले. रात्री १२ वाजता कळले की, काही जणांचा मृत्यू झाला. आम्हाला ओळख पटविण्यासाठी नेण्यात आले. मला तेव्हा कळले की, बाबांचा आणि काकांचा मृत्यू झाला, असे असावरी जगदाळे हिने मुख्यमंत्र्यांना सांगितले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: बामणोली, ता. मिरज, जि. सांगली तसेच परिसरातील तमाम लोकांना आमचे अशिलांनी दिले माहिती व अधिकारावरून या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन :** जिल्हा सांगली तालुका पोट तुकडी मिरज पैकी गांव बामणोली येथील सर्व्हे नं. २७/९४ याचे एकूण क्षेत्र ३७१.७४ चौ. मी. या पैकी पश्चिम बाजूचे १८५.८७ चौ. मी. ची संपूर्ण खुली मिळकत यांसी चतु:सिमा – पूर्वेस :– श्री. पाटील यांची मिळकत, दक्षिणेस श्री. धोंडीराम थोरात यांची मिळकत, पश्चिमेस :– रस्ता :– उत्तरेस :– रस्ता येणे प्रमाणे चतु:सिमेतील मिळकत तदंगभुत वस्तुसह व सर्व प्रकारचे इजमेंटरीचे हक्कासह तसेच याच सर्व्हे नंबर मधील सर्व समाईक रस्त्यातून मुख्य रस्त्यास जाणे येणेचे हक्कासह.

२) वर कलम १ मधील मिळकत ही श्री. अंकुश मारुती चव्हाण व श्री. विलास मारुती चव्हाण यांचे प्रत्यक्ष मालकी कब्जे वहिवाटीची मिळकत असून वरील नमूद मिळकत मालकांनी सदर मिळकत विक्री करण्याचे ठरविले असून ती आमचे अशिलांनी खरेदी घेणेचे ठरविले आहे. वरील नमूद मिळकती बाबत कोणत्याही प्रकारे बोजा, गहाण, दान, करार, मदार मृत्यूपत्र नसले बाबतचा निर्वाळा देवून सदरची मिळकती निर्वेध, निजोखमी असले बाबतचे आमचे अशिलांना सदर मिळकत मालकांनी सांगितलेले आहे.

३) सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, वरील नमूद मिळकती अनुषंगाने कोणाही इसमाचा अगर वित्तीय संस्था, बँका यांचा काहीही हितसंबंध करार, मदार, बक्षीस, पोटगी, गहाण दान, अग्रहक्क, मृत्यूपत्र वगैरे असलेस खाली नमूद केले पत्त्यावर कागदपत्रानिशी नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत संपर्क साधावा. यात काही कसूर केलेस आमचे अशिल हे वरील नमूद मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजून सदर मिळकत मालक यांचे बरोबर खरेदीपत्राचा व्यवहार पूर्ण करतील. खरेदीपत्रानंतर आलेल्या तक्रारी आमचे अशिलांच्यावर व वरील नमूद मिळकतीवर बंधनकारक असणार नाहीत याची नोंद घ्यावी.

म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

सांगली.

दि. २६/०४/२०२६

अशिला तर्फे ॲडव्होकेट.

**ॲड. अमोल शंकर डोंबे**

प्लॉट नं. ११, नंदनवन नगरी,

कलानगर, सांगली

मोबा. नं. ८२७५२५७९७२



### जाहीर नोटीस

तमाम लोकांना आमचे अशिल श्री. विलास मारुती चव्हाण रा. बामणोली, ता. मिरज, जि. सांगली यांनी दिले माहिती व अधिकारावरुन या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन :** जिल्हा सांगली तालुका पोट तुकडी मिरज पैकी गांव बामणोली येथील सर्व्हे नं. २७/९४ याचे एकूण क्षेत्र ३७१.७४ चौ. मी. या पैकी पश्चिम बाजूचे १८५.८७ चौ. मी. ची संपूर्ण खुली मिळकत यांसी चतु:सिमा पूर्वेस :– श्री. पाटील यांची मिळकत, दक्षिणेस श्री. धोंडीराम थोरात यांची मिळकत, पश्चिमेस:– रस्ता उत्तरेस:– रस्ता येणे प्रमाणे चतुः सिमेतील मिळकत तदंगभुत वस्तुसह व सर्व प्रकारचे इजमेंटरीचे हक्कासह तसेच याच सर्व्हे नंबर मधील सर्व समाईक रस्त्यातून मुख्य रस्त्यास जाणे येणेचे हक्कासह

२) वर कलम १ मधील मिळकत ही आमचे अशिल व त्यांचा सख्खा भाऊ अंकुश मारुती चव्हाण याचे मालकी कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचे रेकॉर्ड सदरी त्यांचे नावाची नोंद ही आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलांचे आईचे पश्चात वारसा हक्काने त्यांना प्राप्त झालेली आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलांची आई शकुंतला मारुती चव्हाण यांनी नोंद खरेदी दस्त नं. सनग २६०० /१९८८ अन्वये दि. १४/०७/१९८८ रोजी व सावकार हणपती जाधव यांचेकडून खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीचा वर नमूद नोंद खरेदी दस्ताची मूळ प्रत आमचे अशिलांचेकडून तहसिल कार्यालय, मिरज परिसरातून गहाळ झालेली असून ती शोधू– नही आज अखेर सापडलेली नाही याकरिता सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करणे भाग पडलेले आहे.

३) सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की वरील नमूद मिळकती अनुषंगाने असलेले मूळ खरेदी दस्त नं. सनग २६००/१९८८ चा कोणास सापडलेस तो खाली नमूद केले पत्त्यावर ७ (सात) दिवसाचे आत आणून जमा करावा अथवा आमचे बरोबर संपर्क करावा.

म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

सांगली.

दि. २५/०४/२०२५

अशिला तर्फे ॲडव्होकेट.

**ॲड. अमोल शंकर डोंबे**

प्लॉट नं. ११, नंदनवन नगरी,

कलानगर, सांगली

मोबा. नं. ८२७५२५७९७२


# बेकायदेशीर वास्तव्य करणारे एक हजारांहून अधिक ताब्यात

**अहमदाबाद :** गुजरातच्या अहमदाबाद आणि सुरतमध्ये बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या एक हजारांहून अधिक बांगलादेशी स्थलांतरितांना ताब्यात घेण्यात आले आहे. या सर्वांना लवकरच देशाबाहेर काढण्यात येईल, असे गृह राज्यमंत्री हर्ष संघवी यांनी शनिवारी सांगितले.

अहमदाबादमध्ये ८९० आणि सुरतमध्ये १३४ बांगलादेशींना ताब्यात घेण्यात आले. यामध्ये अनेक महिला आणि मुलांचा समावेश आहे. गुजरात पोलिसांची आतापर्यंतची ही सर्वांत मोठी कारवाई आहे, असेही संघवी म्हणाले.

गुजरातमध्ये बेकायदा वास्तव्य करणाऱ्यांनी स्वतःहून पोलिसांना शरण यावे. अन्यथा, त्यांना शोधून काढले जाईल आणि देशाबाहेर काढले जाईल, असा इशारादेखील त्यांनी दिला. यासोबतच, अशा व्यक्तींना ज्यांनी आश्रय दिला, त्यांच्यावरदेखील कारवाई केली जाईल, असेही सिंघवी यांनी सांगितले.

अहमदाबाद आणि सुरतमध्ये एक हजारांहून अधिक जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांनी पश्चिम बंगालमध्ये घुसखोरी करताना बनावट कागदपत्रे बनवली. त्याआधारे, देशाच्या विविध भागात वास्तव्य करत ते गुजरातमध्ये आले. यातील अनेक जण अमली पदार्थमध्ये गुंतलले आहेत, असेही ते म्हणाले.

अलीकडेच अटक केलेल्या चार बांगलादेशींपैकी दोघे ङ्गअल कायदाफ या दहशतवादी संघटनेसाठी काम करत होते, हे स्पष्ट झाले आहे. घुसखोरांसाठी बनावट कागदपत्रे तयार करुन देणाऱ्यांवरदेखील कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा सिंघवी यांनी दिला आहे. या सर्वांना बांगलादेशाकडे सोपविण्यासंदर्भाती प्रक्रिया लवकरात लवकर पार पाडली जाईल, असेही ते म्हणाले.

गुजरातमधील बेकायदेशीर स्थलांतरितांवर कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार पाकिस्तानी नागरिकांना गुजरात सोडण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. राज्यात इतर देशांचे नागरिक बेकायदेशीरपणे राहत असतील तर त्यांचाही शोध घेतला जात आहे, असेही संघवी म्हणाले.

# उमळवाड येथे पहाटे दरोडा; चाकूचा धाक दाखवून ऐवज लंपास

(पान १ वरून)

आतील कडी बाहेरून काढून चोरट्याने घरात प्रवेश केला. चोरटे तिजोरी उघडत असताना तिजोरीचा आवाज आल्याने जमादार दाम्पत्य जागे झाले. त्यांनी उठण्याचा प्रयत्न केला असता चोरट्याने त्यांना चाकूचा धाक दाखवून तोंडावर बॅटरीचा उजेड पाडत जीवे मारण्याची धमकी दिली व गप्प बसण्यास सांगितले. तिजोरीतील दोन तोळे सोने व ९० हजार रुपयाची रोकड आणि पत्नी सलमाच्या गळ्यातील अर्धा तोळ्याचे मंगळसूत्र त्यांनी लंपास केले. घरामध्ये तिघे आणि बाहेर एक असे एकूण चार चोरटे असल्याची शक्यता जमादार यांनी व्यक्त केली .

चोरटे जाताच जमादार यांनी आरडाओरडा करून तसेच मोबाईल वरून शेजाऱ्यांना याची कल्पना दिली. चोरट्यांनी शेजाऱ्यांच्या घरांना बाहेरून कडी घातली होती. या घटनेबाबतची माहिती जमादार यांनी तातडीने आपत्कालीन क्रमांक ११२ ला दिली. तसेच पोलीस पाटील विजय कुराडे यांना दिली. जयसिंगपूर पोलीस घटनास्थळी लगेच दाखल झाले.

जयसिंगपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्यवान हाके यांनी पहाटेच घटनास्थळाची माहिती घेतली व श्वान पथकास पाचारण केले. श्वान घरापासून काही अंतरावर घोटमळत राहिले.

जमादार यांच्या घरातून चोरट्याने चोरून नेलेली तीन लेडीज पर्स काही अंतरावर असलेल्या सुरगोंडा मगदूम यांच्या ऊस असलेल्या शेतात रिकाम्या आढळून आल्या. या घटनेमुळे उमळवाड सह परिसरातील गावात घबराट पसरली असून पोलिसांनी दरोडेखोरांचा शोध घेऊन रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

# आणखी तीन संशयित दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त

(पान १ वरून)

उद्ध्वस्त करण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याने २०१८ मध्ये पाकिस्तानात प्रशिक्षण घेतले होते. काही दिवसांपूर्वी त्याने काश्मीर खोऱ्यात घुसखोरी केली होती. शोपियान जिल्ह्यातील छोटीपोरा येथे अशाच एका कारवाईत लष्कर–ए–तैयबा (एलईटी) चा सक्रिय कमांडर शाहिद अहमद कुट्टे याचे घर उद्ध्वस्त करण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या तीन ते चार वर्षांपासून तो अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होता, असा दावा अधिकाऱ्यांनी केला. कुलगाम जिल्ह्यातील मतलहामा भागात २०२३ पासून सक्रिय असलेला आणि अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या झाकीर अहमद गनी याचे घरही रात्रीच्या वेळी पाडण्यात आले, असे त्यांनी सांगितले.



आतापर्यंत पाच संशयित दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त करण्यात आली आहेत. पहलगाम रक्तपात घडवून आणण्यात मदत केल्याचा आरोप असलेल्या आदिल हुसेन आणि आसिफ शेख यांची बिजबेहरा आणि त्रालमधील घरेही स्फोटकांनी उडविण्यात आली. ही कारवाई करण्यापूर्वी सुरक्षा दलाच्या जवानांनी घरातील रहिवाशांना तसेच शेजाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी हलविले होते. अनंतनाग पोलिसांनी गुरुवारी तीन दहशतवाद्यांचे रेखाचित्रे प्रसिद्ध केली होती.

ज्योतिष व संख्या शास्त्रावर आधारित शुभांक

**257-4 के 268-6**

**मिझोरम राज्य लॉटरी – राजश्री Shani Weekly Lottery** — Draw Time: 1.00 PM — Draw Date: 26-04-2025

| Prize | Numbers |
|---|---|
| 1st Prize ₹ 11Lakhs | 14G-7306 |
| FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES | |
| 2nd Prize ₹ 9,000 | 6790 |
| 3rd Prize ₹ 500 | 7658 |
| 4th Prize ₹ 300 | 0274 3236 3511 4816 5139 5398 5567 6691 6865 9799 |
| 5th Prize ₹ 200 | 2303 3479 3754 4601 4870 5271 5687 6076 7665 8871 |

6th Prize ₹ 100/- (COMMON TO ALL SERIES)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0121 | 0733 | 2010 | 2770 | 3941 | 4681 | 5482 | 6589 | 7287 | 8904 |
| 0170 | 0753 | 2022 | 2878 | 3945 | 4690 | 5574 | 6611 | 7412 | 8930 |
| 0182 | 0775 | 2110 | 2906 | 3996 | 4728 | 5683 | 6675 | 7460 | 8948 |
| 0208 | 0848 | 2114 | 3062 | 4057 | 4882 | 5799 | 6679 | 7555 | 8976 |
| 0281 | 0903 | 2221 | 3078 | 4103 | 5000 | 5876 | 6718 | 7756 | 9175 |
| 0288 | 1146 | 2235 | 3138 | 4171 | 5080 | 5898 | 6731 | 7810 | 9205 |
| 0446 | 1170 | 2362 | 3251 | 4240 | 5085 | 5917 | 6738 | 7842 | 9298 |
| 0469 | 1406 | 2387 | 3274 | 4354 | 5108 | 6114 | 6752 | 7857 | 9300 |
| 0573 | 1410 | 2412 | 3318 | 4358 | 5135 | 6140 | 6773 | 7936 | 9362 |
| 0585 | 1633 | 2593 | 3805 | 4383 | 5237 | 6248 | 6851 | 8180 | 9599 |
| 0628 | 1734 | 2650 | 3830 | 4395 | 5281 | 6299 | 6884 | 8338 | 9632 |
| 0703 | 1808 | 2664 | 3831 | 4449 | 5305 | 6337 | 7006 | 8728 | 9719 |
| 0705 | 1884 | 2708 | 3834 | 4450 | 5359 | 6346 | 7058 | 8799 | 9730 |
| 0714 | 1885 | 2718 | 3853 | 4461 | 5383 | 6448 | 7093 | 8841 | 9834 |
| 0732 | 1957 | 2766 | 3914 | 4625 | 5431 | 6575 | 7249 | 8880 | 9890 |

Check result with Official Gazette. Issued by : Director, Mizoram State Lotteries.

**मिझोरम राज्य लॉटरी – राजश्री Orchid Weekly Lottery** — Draw Time: 4.00 PM — Draw Date: 26-04-2025

| Prize | Numbers |
|---|---|
| 1st Prize ₹ 11Lakhs | 58B-5244 |
| FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES | |
| 2nd Prize ₹ 9,000 | 3238 |
| 3rd Prize ₹ 500 | 2712 |
| 4th Prize ₹ 300 | 0610 1092 1507 1669 2314 2600 5347 5573 8456 9922 |
| 5th Prize ₹ 200 | 2300 2965 3586 4812 5290 6446 6633 6761 7862 7867 |

6th Prize ₹ 100/- (COMMON TO ALL SERIES)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0005 | 0853 | 1730 | 2838 | 4072 | 5081 | 6027 | 7036 | 8123 | 9377 |
